महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

आमचे वाचक, हितचिंतक, जाहिरातदार यांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

● संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ४०, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार ३१ डिसेंबर २०२४ ते सोमवार ६ जानेवारी २०२५ ● POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 ● RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

# प्राजक्ता माळीच्या तक्रारीनंतर महिला आयोग ॲक्शन मोडमध्ये, थेट आदेशच काढले



■ मुंबई : विशाल कारंडे

**आमदार सुरेश धस यांनी मराठमोळी अभिनित्री प्राजक्ता माळीबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकारण चांगलेच तापले आहे. अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्याबाबत वक्तव्य करत असताना सुरेश धस यांनी प्राजक्ता माळीच्या नावाचा उल्लेख करत वादग्रस्त वक्तव्य केले होते. आता प्राजक्ता माळीने यासंदर्भात राज्य महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीनंतर राज्य महिला आयोग ॲक्शन मोडमध्ये आले आहे. प्राजक्ता माळीने मुंबई पोलिस आणि बीड पोलिसांना अर्ज दिला आहे. प्राजक्ता माळी यांच्या तक्रारीवर आवश्यक ती कार्यवाही नियमानुसार करणार आहोत.**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ही माहिती दिली. रुपाली चाकणकर यांनी पोलिसांना याबद्दलचे निर्देश दिले आहेत. संपूर्ण घटनेचा वस्तुनिष्ठ अहवाल देण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. प्राजक्ता माळी हे एक निमित्त आहे. पण आज मोठ्या प्रमाणात महिलांचं चारित्र्य हनन केलं जात आहे, असे रुपाली चाकणकर यांनी सांगितले. रूपाली चाकणकर यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, 'प्राजक्ता माळीचा अर्ज महिला आयोगाला प्राप्त झाला. दोन दिवसांमध्ये महिला आयोगाचे वकील आणि त्यामधील तज्ज्ञ यांनी शहानिशा करून हा अर्ज आज दुपारी मुंबई पोलिस आयुक्तांच्या कार्यालयाला पाठवला आहे. त्याचसोबत त्याची एक प्रत बीड पोलिस अधिक्षक आणि सायबर क्राईम यांच्याकडे पाठवण्यात आले आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

## संक्षिप्त

### राज्यातील १३ रेल्वे स्थानकांत फलाट तिकीट विक्रीवर निर्बंध, गर्दीचा भार कमी करण्यासाठी मध्य रेल्वेचा मोठा निर्णय

■ मुंबई : गणेश बागडे

नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक नागरिक समुद्रकिनारी, प्रेक्षणीय स्थळी भेटी देतात. त्यामुळे नियमित प्रवाशांसह सुट्टीनिमित्त घराबाहेर पडलेल्यांची संख्या अधिक असते. मध्य रेल्वेवरील प्रमुख रेल्वे स्थानकांत गर्दीचा भार वाढतो. वर्षाच्या अखेरीस होणारी प्रवाशांची



गर्दी विभाजित करण्यासाठी महाराष्ट्रातील १३ आणि कर्नाटकातील एका रेल्वे स्थानकात फलाट तिकीट विक्री बंद करण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. २ जानेवारीपासून पुन्हा फलाट तिकीट विक्री सुरू होईल, असे मध्य रेल्वेने सांगितले. मुंबईसह राज्यातील विविध पर्यटनस्थळी वर्षअखेरच्या कालावधीत पर्यटकांची प्रचंड वर्दळ सुरू आहे. बहुसंख्य प्रवासी प्रवास करताना रेल्वेसेवाचा वापर केला जातोय. गर्दीचा लोंढा वाढून प्रवाशांची धक्काबुक्की होऊन, त्याचे स्वरूप चेंगराचेंगरीसारखे होऊ शकते. अशा घटना टाळण्यासाठी प्रमुख रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या गर्दीचे नियोजन करण्यासाठी सुरक्षा व्यवस्थेचा चोख बंदोबस्त केला आहे.

### करदात्यांना आनंदाची बातमी! १५ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त? अर्थसंकल्पात मोठ्या निर्णयाची शक्यता

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

देशभरातील करदात्यांसाठी आनंदाची बातमी १५ लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना टॅक्समध्ये मोठी सूट मिळू शकते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार केंद्र सरकार मध्यमवर्गाना सवलत देण्याबरोबरच अर्थव्यवस्थेतील मंदीमुळे मागणीला चालना देण्यासाठी हा निर्णय घेऊ शकतं. सरकारच्या या निर्णयामुळे देशभरातील




लाखो करदात्यांना विशेषत: महागाईच्या ओझ्याखाली दबलेल्या शहरी मध्यमवर्गाला मोठा दिलासा मिळू शकतो. गरीब आणि मध्यमवर्ग हा खाद्यपदार्थांच्या किंमती वाढल्यानं सध्या त्रस्त आहे. त्यामुळे येत्या वर्षात मध्यम वर्गाला मोठा दिलासा मिळू शकतो. मध्यम वर्ग मोठ्या आर्थिक तणावात. करकपात झाल्यास मध्यमवर्गाला मोठा दिलासा. उपभोग्य वस्तूंच्या मागणीला पाठबळ मिळणार. आर्थिक मंदी आणि राहणीमानाच्या वाढत्या खर्चानं मध्यमवर्ग आर्थिक दबावात. करकपातीचा सर्वाधिक लाभ नोकरदार वर्गाला होणार. नोकरदारांच्या हातात अधिक पैसा येईल.

## मुंबईतील हवेचा दर्जा खालवला, मुंबई महापालिकेकडून कठोर पाऊल उचलण्यास सुरुवात

■ मुंबई : राकेश गायकवाड

मुंबईसह उपनगर आणि आजूबाजूच्या परिसरातील हवेची गुणवत्ता खालवल्याचे पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील हवेचा दर्जा खालवला आहे. मुंबईची हवा अत्यंत चिंताजनक स्थितीत पोहोचली आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून मुंबईत ठिकठिकाणी अंशत: ढगाळ वातावरण दिसत आहे. यामुळे मुंबईतील हवेच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. सध्या मुंबईचा हवा निर्देशांक १०४ इतका नोंदवण्यात आला आहे. यामुळे आता मुंबई महापालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळाने कठोर पाऊल उचलण्यास सुरुवात केली आहे. मुंबईचा हवा निर्देशांक १०४ इतका असल्याची नोंद करण्यात आली आहे. काही भागात हवेचा निर्देशांक अतिवाईट स्थितीत नोंदवण्यात आला आहे. तर काही भागात वाईट हवेची नोंद करण्यात आली आहे. मुंबईतील विलेपार्ले, कुलाबा, मालाड, कुर्ला, भांडुप, देवनार, बोरिवली, वांद्रे पूर्व या ठिकाणच्या हवेची गुणवत्ता अतिवाईट स्थितीत असल्याचे बोललं जात आहे. तर छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ,



जुहू, महापे, नेरुळ या ठिकाणी हवेची गुणवत्ताही वाईट असल्याचे नोंद करण्यात आले आहे. मुंबईत सातत्याने होणारे वातावरणातील बदल आणि बांधकामे यामुळे मुंबईतील हवेवर सातत्याने परिणाम होत आहे. यामुळे असंख्य मुंबईकरांना सध्या प्रदूषणाचा त्रास होत आहे.

मुंबईत वातावरणातील घातक असलेल्या पीएम २.५ आणि पीएम १० धुलीकणांचे प्रमाणही वाढले आहे. त्याचबरोबर देवनार, कुर्ला, कांदिवली, मालाड, नेव्ही नगर, कुलाबा, शिवडी, वरळी परिसरातही 'वाईट' हवेची नोंद झाली आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता सातत्याने खालावत असलेल्या स्तराचा सामना करण्यासाठी मुंबई महापालिकेने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महापालिकेने पुढील काही दिवस सातत्याने रस्त्यांवर पाणी फवारणी करत आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

## 'डॉ. मनमोहन यांच्यावर राग धरून मोदी-शाहांनी..', ठाकरेंच्या सेनेची टीका; मुंडेच्या कॉंग्रेस प्रवेशाचाही उल्लेख

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

'सध्याचा भारत म्हणजे मोदी-शहा सरकारच्या बापजाद्यांची कमाई नाही. तरीही माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या अंत्यसंस्कारासाठी दोन मीटर जमीन नाकारण्यात आली व देशाला अर्थसंकटातून बाहेर काढणाऱ्या या असामान्य माणसाला निगमबोध घाट स्मशानभूमीत अखेरचा निरोप देण्यात आला. याविषयी लाखो भारतीयांच्या मनात हळहळ झाल्याशिवाय राहणार नाही,' अशा कठोर शब्दांमध्ये माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या पक्षाने सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. 'डॉ. मनमोहन



सिंग यांनी अखंड देशसेवा केली. ते दहा वर्षे पंतप्रधानपदी होते. या दहा वर्षात त्यांनी देशाला आर्थिक अराजकातून बाहेर काढले व मध्यमवर्गीयांना अच्छे दिन दाखवले. डॉ. सिंग यांचे जेवढे शिक्षण आहे तेवढे शिक्षण संपूर्ण भाजप मिळून नसावे. एक ज्ञानी म्हणून जगात त्यांचा गौरव होत असे. हा गौरव भारत देशाचा होता.

(शेष पृष्ठ २ वर)

## पालकमंत्रिपदावरुन शीतयुद्ध; अजित पवार, चंद्रकांत पाटील यांच्यासह सोलापूर, सांगलीबाबतही उत्सुकता

■ पुणे : अभिजीत येरल्लू

उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपचे ज्येष्ठ नेते, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह पश्चिम महाराष्ट्रात नऊ कॅबिनेट; तसेच एक राज्यमंत्री नियुक्त केल्याने पालकमंत्रिपद कोणाकोणाला द्यायचे, यावरून जोरदार शीतयुद्ध रंगले आहे. बीडचे पालकमंत्रिपद मुंडे बहीण-भावाला न देता बाहेरील जिल्ह्यातील नेत्याला देण्याची दाट शक्यता आहे. ही जबाबदारी पश्चिम महाराष्ट्रातील एका मंत्र्यावर सोपवायची की नाही, यावर जोरदार खलबते सुरू असल्याचे समजते. पवार पुण्याचे पालकमंत्री होण्याची



दाट शक्यता आहे. पाटील यांना कोणता जिल्हा मिळणार, यावर पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय गणिते अवलंबून आहेत. सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांना मंत्रिपद मिळालेले नाही.

(शेष पृष्ठ २ वर)

## नवी मुंबई विमानतळावर १७ एप्रिलपासून विमान उड्डाणं होणार सुरू

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

गेल्या अनेक वर्षांपासून ज्या विमानतळाची राजकीय आणि स्थानिक पातळीवर फक्त चर्चा ऐकायला मिळत होती, ते विमानतळ आता प्रत्यक्षात आकाराला येत असून तिथे प्रत्यक्षात प्रवासी व माल वाहतूक करणाऱ्या विमानांचं उड्डाण कधीपासून सुरू होणार यासाठीचा मुहूर्त अखेर ठरला आहे 'सिडको'चे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती दिली असून याबाबत विमानतळाचं काम सोपवण्यात आलेल्या अदाणी एअरपोर्ट होल्डिंग लिमिटेडकडूनदेखील दुजोरा देण्यात आला आहे.

नवी मुंबईकरांची विमानतळावरून उड्डाणं सुरू होण्याची प्रतीक्षा १७ एप्रिल रोजी संपणार आहे. यासंदर्भात विजय सिंघल यांनी दिलेल्या माहितीनुसार १७ एप्रिलपासून



इथून प्रवासी व मालवाहतूक सुरू करण्याचा त्यांचा मानस आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापेक्षा या विमानतळाची क्षमता दुप्पट असेल. पहिल्या टप्प्यात वर्षाला २ कोटी प्रवासी वाहतूकीची क्षमता असेल. टर्मिनल इमारतीचे ८४ टक्के काम पूर्ण झाले असून चारही टर्मिनल स्वयंचलित यंत्रणेद्वारे एकमेकांना जोडले आहेत', असं ते म्हणाले.दरम्यान, अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल यांनी १७ एप्रिलच्या मुहूर्ताला दुजोरा दिला आहे. 'आम्ही नवी मुंबई विमानतळाच्या उद्घाटनासाठी १७ एप्रिलचं लक्ष्य निश्चित केलं आहे. विमान उड्डाण परवाना मिळाल्यानंतर ७० दिवसांत उद्घाटन केलं जाऊ शकतं. त्यानुसार ही तारीख आम्ही निश्चित केली आहे. ६ फेब्रुवारीला विमान उड्डाण परवाना मिळण्याची शक्यता आहे', असं बन्सल यांनी नमूद केल्याचं इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान, २८ डिसेंबर रोजी नवी मुंबई विमानतळावरील धावपट्टीवर पहिल्यांदा एक व्यावसायिक विमान यशस्वीरीत्या उतरवण्यात आलं. विमानतळाच्या कार्यक्षमतेबाबतच्या चाचणीचा भाग म्हणून टेकऑफ आणि लँडिंगच्या चाचण्या घेतल्या जाणार आहेत.

## मेलबर्न कसोटीत भारताचा लाजिरवाणा पराभव
### ऑस्ट्रेलियाची मालिकेत २-१ आघाडी

■ मेलबर्न: वृत्तसंस्था

भारतविरुद्ध ऑस्ट्रेलिया पाच सामन्यांची बॉर्डर- गावस्कर मालिका खेळवली जात आहे. पाच सामन्यांची मालिकेतील चौथा सामना मेलबर्न येथे खेळवली जात आहे. बॉक्सिंग डे कसोटीचा सामन्याचा नाणेफेक ऑस्ट्रेलियाने जिंकला चौथा सामना जिंकण्यातही यश मिळवले. ऑस्ट्रेलियाने हा सामना १८४ धावांनी जिंकला आणि मालिकेत २-१ ने आघाडी घेतली.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध मेलबर्न कसोटीत भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. फलंदाजी भारत बॅकफूटवर असताना, खराब अंपायरिंगनेही भारताचा खेळ केला. अखेरच्या दिवशी भारतीय संघाला विजयासाठी ३४० धावांचे लक्ष्य होते. भारताला सुरुवातीचे धक्के बसले आणि धावसंख्या ३ गडी बाद ३३ अशी झाली, पण ऋषभ पंत आणि यशस्वी जैस्वाल यांनी झुंज देत सामन्याला जीवदान दिले. मात्र, शेवटच्या सत्रात दोन मोठे निर्णय भारताच्या




विरोधात गेले आणि त्यांचा दुसरा डाव १५५ धावांवर आटोपला.

(शेष पृष्ठ २ वर)

## राज्यातील बस आगारांना 'कलर कोड'



**भाईंदर- राज्यातील बस आगारांची वेगळी ओळख तयार करण्यासाठी त्यांना विशिष्ट रंग दिला जाणार आहे. शनिवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मिरा भाईंदर येथील बस आगारांची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी या कलर कोडची घोषणा केली.**

■ मुंबई : यश सावंत


राज्यातील बस आगारांची अवस्था बिकट होऊ लागली आहे. त्यामुळे बहुतांश बस आगारांच्या नूतनीकरणाचा निर्णय एस.टी.महामंडळाने घेतला आहे. त्यानुसार आता या बस आगारांची वेगळी ओळख तयार करण्यासाठी त्याच्या संरचनेत विशेष 'कलर कोड' वापरला जाणार आहे. जेणेकरून बस आगार सहज ओळखणे शक्य होणार आहे. सध्या काही रंग प्रशासनाने निवडले आहे. यात प्रायोगिक तत्वावर हे रंग काही बस आगारांना लावून त्यात उत्तम दिसणाऱ्या रंगाची अंतिम निवड केली जाणार असल्याचे सरनाईकांनी सांगितले आहे. तर प्रामुख्याने राज्यात तालुका, जिल्हा आणि महानगरपालिका क्षेत्रात बस आगारांची उभारणी केली जात आहे. हे बस आगार उभारण्यासाठी निधीची कमतरता जाणवत असल्यामुळे त्यात बीओटी ( बांधा वापरा हस्तांतरित करा) तत्वाचा वापर करण्यात येणार आहे. यात बांधकाम करून देणाऱ्या संबंधित प्राधिकरणासोबत ६० वर्षाचा भाडेकरार केला जाणार आहे. यापूर्वी बीओटी तत्त्वावर ३० वर्ष भाडेकरार करण्याची अट शिथिल करण्यात आली असल्याची माहिती एस.टी. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांनी दिली आहे. राज्यातील बस आगार विकसित करत असताना त्यांची तीन टप्प्यात विभागानी केली जाणार आहे.

पाहिजेत

ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे.
पात्रता : १२ वी / मराठी भाषा व कॉम्प्युटर चे ज्ञान असणे आवश्यक.
पत्ता : जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, बांद्रा (पूर्व)
संपर्क : ०२२ ३१८०८५०९ / ९८०४३८६७४८ / ९८९२३८६७४८

महाराष्ट्र क्राईम टाइम्स






# प्रदूषणाचा विळखा!

मानवजातीसमोर धोक्याची घंटा वाजवणाऱ्या वाढत्या प्रदूषणावर उपाययोजनांकडे व्यवस्थेची सोयीस्कर डोळेझाक, नाकर्तेपणा आणि एकूणच सामाजिक जडत्वामुळे प्रदूषणाचा राक्षस मोकाट सुटला आहे. दिल्ली आणि मुंबई या देशाच्या दोन राजधान्यांना प्रदूषणाने अक्षरश: घेरले आहे. महाराष्ट्रातील २२ शहरेही प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असून, हा फास दिवसेंदिवस आवळतच चालला आहे. देशाच्या राजधानीतील हवेची गुणवत्ता हिवाळ्यात कमालीची घसरते. पंजाब-हरियाणा-उत्तर प्रदेशात पिकांचे खुंट जाळल्यामुळे, प्रदूषणाची पातळी प्रचंड वाढते. सध्या दिल्लीत हलक्या पावसामुळे थंडी वाढली असून, प्रदूषणातून काहीसा दिलासा मिळाला असला तरी धोका टळलेला नाही. ऐन नाताळात दिल्ली व आसपासच्या भागात इतके धुके होते की, त्यामुळे दृश्यमानता कमी झाली. रेल्वेगाड्यांचा वेग मंदावला. हवाई उड्डाणाच्या वेळाही मागे-पुढे कराव्या लागल्या. पालम आणि सफदरजंग विमानतळांवर सकाळी ६ वाजता सामान्य दृश्यमानता १०० मीटरपर्यंत कमी झाली. दिल्लीतील किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्या खाली उतरले असून, कमाल तापमान २१ अंश सेल्सिअसवर गेले. हंगामाच्या सरासरीपेक्षा हे २ अंशांनी जास्त होते. सरासरी हवामान दर्जा गेल्या आठवड्यात गंभीर श्रेणीतून अतिगंभीर श्रेणीत आला. प्रदूषणामुळे हिवाळ्यात शाळा काही दिवस बंद ठेवाव्या लागतात. गेल्या काही दिवसांतील आर्थिक राजधानी मुंबईची स्थिती तर आणखीच भयानक आहे! मागच्या आठवड्याच्या अखेरीस पश्चिमी प्रकोपामुळे आर्द्रतेचे वाढलेले प्रमाण, मंदावलेला वाऱ्यांचा वेग आणि हवेत साचलेली



प्रदूषके यामुळे दिवसभर धुक्याचे साम्राज्य होते.

'धुक्यात हरवली वाट' अशी स्थिती होती. अगदी काही अंतरावरच्या इमारती धुरक्यामध्ये अदृश्य झाल्या. केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या ॲपवर मुंबईतील हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक १६० ते १७० दरम्यान, म्हणजे मध्यम श्रेणीत दिसत होता; तर खासगी ॲपवर ही आकडेवारी 'आरोग्यासाठी घातक' अशी नोंदली गेली. गेल्या गुरुवारी परळ, लोअर परळ, भायखळा भागांमध्ये दाट धुके दिसत असताना, दुपारी हवेची गुणवत्ता मध्यम श्रेणीतील होती; तर आझाद मैदान, ओव्हल मैदान या दक्षिण मुंबईतील भागांमध्ये समोरच्या इमारतीही दिसत नव्हत्या. वास्तविक, याचा थेट लोकांच्या आरोग्याशी संबंध आहे. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक हा सरासरी दीडशेच्या पुढे असल्याने, जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमाणानुसार, हा निर्देशांकही आरोग्याला घातक आहे. थंडीत वाऱ्यांचा वेग कमी झाल्याने, प्रदूषके साचून राहतात. ती नियंत्रित करण्यासाठी कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत, याबद्दलच्या सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे दिल्या जातात; पण त्यांचे पालन केले जाते की नाही, हे कोण पाहणार? लोकांनी शेकोट्या पेटवू नयेत, कचरा जाळू नये, असे आवाहन केले जाते; पण ठिकठिकाणी रस्त्यांलगतही ढिगांनी कचरा जाळला जातो आणि त्यात बरेचदा प्लास्टिकच्या कचऱ्याचाही समावेश असतो. मुंबईच्या २४ विभागांसह महाराष्ट्रात ६० ठिकाणी प्रदूषणमापन केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत, अशी माहिती देण्यात आली होती; पण ही केंद्रे स्थापन करण्यासाठी इतकी वर्षे लागावीत? दोन वर्षांपूर्वी मार्चमध्ये कधीही नसतो, असा उन्हाळा मुंबईत जाणवत होता. तापमान तेव्हा ३९ अंशांवर गेले. असे क्वचितच घडते. पुण्यापेक्षाही मुंबईत तेव्हा जास्त तापमान असल्याचे दिसून आले. संपूर्ण देशभरात अनेक शहरांमध्ये २०२२ मध्ये उष्म्याची लाट आली होती.

उन्हाळा वा हिवाळा असो की पावसाळा, वातावरणीय बदलांमुळे नवे संकट उभे ठाकले आहे, हे लक्षात घ्यावे लागेल, तेवढ्यावर थांबून चालणार नाही, तर त्याची नोंदही घेणे आवश्यक आहे. याचा आर्थिक विकासावर थेट परिणाम होत असतो. अवकाळी पाऊस, कडाक्याची थंडी, अतिवृष्टी आणि कडक उन्हाळा अशीच परिस्थिती राहिली, तर मुंबईतील नरिमन पॉईंट आणि शहरातील अन्य चार ठिकाणचा काही भूभाग पाण्याखाली जाईल, असा इशारा तज्ज्ञांनी यापूर्वीच दिला आहे. मुंबईसह ठाणे, भिवंडी, अकोला, इचलकरंजीसारख्या शहरांनाही प्रदूषणाचा धोका वाढला आहे. नवनवी शहरे प्रदूषणाच्या कवेत येत आहेत. हे चांगले चिन्ह नव्हे! या पार्श्वभूमीवर, मुंबई महानगरपालिकेने 'वातावरण कृती आराखडा' तयार केला असून, हे पाऊल टाकणारी मुंबई ही देशातील पहिलीच महापालिका ठरली असली, तरी हा कृती आराखडा कागदावर न राहता, कृतीत उतरला पाहिजे. ऊर्जा आणि वीजनिर्मिती करतानाही किमान कार्बन उत्सर्जन होईल, याची काळजी घेतली गेली पाहिजे. हवामानाची गुणवत्ता सुधारण्यासाठी पायाभूत सुविधांची उभारणी केली गेली पाहिजे.

विकेंद्रित आणि सर्वसमावेशक असे शाश्वत कचरा व्यवस्थापन धोरण आखण्याची गरज आहे. हवेचा दर्जा सुधारण्यासाठी पर्यावरणपूरक तंत्रज्ञानावर भर दिला जावा. किमान कार्बन उत्सर्जन करणाऱ्या वाहतुकीस व शून्य उत्सर्जन इंधनाला चालना दिली पाहिजे. मुंबईतील जैवविविधता राखण्यासाठी व उष्णतेची जोखीम कमी करण्यासाठी हरित आच्छादन वाढवायला हवे. अलीकडील काळात तिन्ही ऋतूंत केवळ मुंबईतच नव्हे, तर पुण्यासारख्या शहरांतील हवाही श्वसनाच्या रोगांना निमंत्रण देणारी ठरू लागली आहे. माणसाला जगण्यासाठी हवेतला प्राणवायू आवश्यक असतो; पण ही हवा तर प्राणघातक आणि म्हणून नकोनकोशी ठरू पाहत आहे. 'जर्मन वॉच' संस्थेच्या अहवालानुसार, हवामान बदलाचा तीव्र फटका बसलेला भारत हा जगातील पाचवा देश ठरला आहे. अंदाधुंद विकासामुळे तापमानवाढ होणार असून, त्याचा परिणाम गंगेच्या खोऱ्यावर होणार आहे. याची झळ तेथील ४८ कोटी लोकांनाच बसणार आहे, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर, पर्यावरणाची जाणीव ठेवूनच विकास करण्याची गरज आहे, याचे भान राज्यकर्त्यांना ठेवावे लागेल. युरोपियन युनियनने २०३० पर्यंत १९९० च्या पातळीपेक्षा ५५ टक्के कमी इतके हरितगृह वायू उत्सर्जन आणण्याचे ठरवले आहे. चीनने कार्बन बाजारपेठ सुरू केली आहे. हवामान बदलांबाबतही भारताने वेगाने पावले टाकण्याची गरज आहे. कारण, हवामान बदलाची झळ मुख्यत: गोरगरीब आणि तळातील वर्गास बसते.

# अमली पदार्थांचा घातक महापूर

२०२४ या वर्षात भारतातील सागरी हद्दीत विक्रमी प्रमाणात अमली पदार्थांचा साठा जप्त केला आहे. वर्षभरात राबविलेल्या पाच मोठ्या मोहिमांत सुमारे ९ हजार ६०० किलोंचा अमली पदार्थांचा साठा पकडला आहे. सुरक्षा व्यवस्था कडक असल्यामुळे अमली पदार्थांची तस्करी रोखण्यात यश आले आहे, ही बाब उल्लेखनीय आहे; पण आजही देशात तपास यंत्रणांच्या डोळ्यांत धूळ फेकून चोरट्या मार्गाने येणाऱ्या अमली पदार्थांचे प्रमाण मोठे आहे. त्याला पायबंद घालणे अत्यावश्यक आहे.

भारतातील सागरी हद्दीत यावर्षी विक्रमी प्रमाणात अमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. वर्षभरात राबविलेल्या पाच मोठ्या मोहिमांत सुमारे ९ हजार ६०० किलोंचा अमली पदार्थांचा साठा पकडला आहे. यात सर्वाधिक प्रमाण चरस आणि मेथामफेटामाईनचे होते. या कारवाईत भारतीय तटरक्षक दल आणि नार्कोटिक्स नियंत्रण ब्युरो (एनसीबी) यांच्यासह अनेक संस्थांनी एकत्र येऊन अमली पदार्थांच्या तस्करांचे मनसुबे उधळून लावले आहेत. मावळत्या वर्षात पकडलेल्या अमली पदार्थांच्या साठ्याचे प्रमाण हे मागील पाच वर्षांत कारवाईतून पकडलेल्या एकूण साठ्यापेक्षा अधिक राहिले आहे. गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी राज्यसभेत माहिती देताना कारवाईची माहिती दिली होती. त्यांच्या मते, २०१९ पासून ते २०२३ पर्यंत पाच वर्षांत भारताच्या सागरी हद्दीत सुमारे ७ हजार ५०० किलो अमली पदार्थांचा साठा जप्त केला. त्याचवेळी यावर्षी ११ महिन्यांतच समुद्रात सुमारे ९ हजार ६०० किलो अमली पदार्थ पकडण्यात यश आले.

मागील आठवड्यातच तटरक्षक दलाने सागरी हद्दीत अमली पदार्थांची तस्करी पकडण्यात मोठे यश मिळवले. अर्थात, तटरक्षक दलाकडून सागरी सीमांचे संरक्षण केले जाते. तटरक्षक दलाने अंदमान समुद्रातील एका नौकेत सुमारे ५ हजार ५०० किलोएवढा मेथामफेटामाईन अमली पदार्थांचा साठा जप्त केला. हा साठा म्यानमारच्या एका मासेमारी करणाऱ्या नौकेतून जप्त केला. यावेळी म्यानमारच्या सहा जणांनाही अटक करण्यात आली आहे. अंदमान आणि निकोबारचे पोलिस महासंचालक हरगोविंदर सिंग धालीवाल यांनी माध्यमांशी बोलताना या अमली पदार्थांची जागतिक बाजारातील किंमत सुमारे ३६ हजार कोटी रुपये असल्याचे सांगितले; मात्र अमली पदार्थांचा हा साठा



अंदमानकडे येत नसल्याचे स्पष्ट केले. आरोपींची चौकशी केल्यानंतर आणखी खुलासा होईल, असे त्यांनी सांगितले. १५ नोव्हेंबर रोजी एका कारवाईत गुजरातच्या एका नौकेतून ७०० किलो मेथामफेटामाईन पकडले. या नौकेतील ८ परकी नागरिकांना बेड्या ठोकल्या. एनसीबी, भारतीय नौदल आणि गुजरात पोलिसांनी संयुक्तपणे मोहीम राबवत कारवाई केली. या कारवाईच्या माध्यमातून अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा भांडाफोड केल्याचा दावा एनसीबीने केला. या कारवाईला 'सागर मंथन-४' असे नाव दिले होते. एनसीबीने यावर्षीच्या प्रारंभी सागरी मंथन अभियानाला सुरुवात केली आणि यानुसार एका पथकाची नियुक्ती करण्यात आली. यात एनसीबीसह भारतीय नौदल, तटरक्षक दल आणि गुजरात पोलिस, एटीएसच्या अधिकाऱ्यांचा समावेश होता. या मोहिमेचा उद्देश बेकायदा अमली पदार्थांच्या तस्करीमुळे राष्ट्रीय सुरक्षेला निर्माण होणारा धोका थांबवणे हा होता. पहिल्या तीन सागर मंथन मोहिमांत ३ हजार ४०० किलोचा अमली पदार्थांचा साठा जप्त केला. त्याचबरोबर ११ इराणी आणि १४ पाकिस्तानी नागरिकांच्या मुसक्या आवळल्या. ते अजूनही भारतीय तुरुंगात हवा खात आहेत. सर्वात मोठे यश पहिल्या सागर मंथन कारवाईला मिळाले. यात एका नौकेतून सुमारे ३ हजार १०० किलो चरसचा साठा पकडण्यात आला. एनसीबीने २०२२ च्या अहवालात म्हटल्यानुसार, अमली पदार्थांची समस्या असण्यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे भारताचे भौगोलिक स्थान. अफूचे उत्पादन करणारे अनेक देश भारताच्या सभोवताली आहेत. पश्चिमेकडे अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराण, पूर्वेकडे म्यानमार, लाओस, थायलंड याचा उल्लेख करता येईल. याशिवाय भारताला मोठी सागरी सीमा असल्याने भारत हे अफू आणि सिंथेटिक अमली पदार्थांसाठी सॉफ्ट टार्गेट ठरले. या अहवालातील अंदाजानुसार, ७० टक्के अमली पदार्थांची तस्करी ही सागरी मार्गाने होते. शिवाय भारताच्या पश्चिम भागात अमली पदार्थांच्या तस्करीत वाढ झाल्याचेही म्हटले आहे. जप्त बहुतांश अमली पदार्थ हे अफगाणिस्तानच्या बंदरातून निर्यात केलेले आहेत. त्यांचा उद्देश भारताच्या किनारपट्टीवर असणाऱ्या राज्यांतून त्याचे वितरण करणे किंवा तेथून मालदिव आणि श्रीलंकेला साठा पाठविण्याचा असतो.

सागरी मार्गाच्या माध्यमातून सर्वाधिक हेरॉईन आणि मेथामफेटामाईन ड्रगची तस्करी केली जाते. ऑगस्ट २०२४ मध्ये एका कार्यक्रमात बोलताना गृहमंत्री अमित शहा यांनी अमली पदार्थ हा केवळ देशातील तरुण पिढीला संपविण्याचे काम करत नाही, तर देशाच्या सुरक्षेवरही घाला घालण्याचे काम करत असल्याचे म्हटले होते. अमली पदार्थांच्या तस्करीतून कमावलेल्या पैशातून दहशतवाद आणि नक्षलवाद्यांना अर्थसाह्य करण्यात येते. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचा वेग मंदावतो. वास्तविक, अमली पदार्थांच्या तस्करांचे जाळे नष्ट करण्याची गरज आहे. अमली पदार्थविरोधातील लढाई करण्यासाठी चार गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

# स्त्रीचारित्र्याचे मारेकरी!


एखाद्याची मानहानी करणे, चारित्र्यहनन करण्याची धमकी देऊन खंडणी वसूल करणे, समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह मजकूर, छायाचित्र पोस्ट करणे, एखाद्याचे खासगी जगणे समाजमाध्यमांवर जाहीर काढणे, त्याच्या चर्चेचे गुऱ्हाळ सुरूच ठेवणे, त्यावर आक्षेपार्ह टीका टिप्पणी करण्याला सोशल मीडियात 'ट्रोलिंग' असे हायटेक नाव दिले जाते. मात्र हे ट्रोलिंग महिला आणि पुरुषांच्या बाबतीत वेगवेगळे असते. पुरुषांच्या ट्रोलिंगमध्ये पुरुषार्थावर हल्ला केला जातो तर महिलेच्या बाबतीत चारित्र्य हे सॉफ्ट टार्गेट असते. आपल्याकडे पुरुषांना 'नामर्द' ठरवणे हे मानहानीचे अखेरचे टोक असते. तर याच मर्दानीपणाला जोडून पुरुषांच्या लैंगिक संदर्भाने ही मानहानी संबंधित पुरुषांच्या संपर्कात असलेल्या महिलांशीही जोडली जाते. केवळ लैंगिक संदर्भानेच आपल्याकडे एखाद्याची 'मर्दानगी' ओळखण्याची पद्धत असल्याने यापलीकडे पुरुषांच्या कर्तृत्वाचे इतर संदर्भ दुय्यम ठरवले जातात. पुरुषांच्या बाबतीत अशी परिस्थिती असताना महिलांच्या संदर्भाने मात्र परिस्थिती अजून बिकट होते. महिलांना कायदा आणि कौटुंबिक किंवा सामाजिक सुरक्षेचे अधिकार पुरुषांच्या तुलनेत अधिक असतात, हे खरे आहे. मात्र चारित्र्यहनन किंवा लोकलज्जा जाहीर करण्याचा धोका पुरुषांच्या तुलनेत महिलांना अधिक असतो. याबाबत महिला सॉफ्ट टार्गेट असतात, एखाद्या महिलेच्या एखाद्या विधानाचे विविध अर्थ काढून चारित्र्यहननात विकृत आनंद मानणारे ट्रोलर्स, पत्रकारितेच्या नावाखाली पितपत्रकारिता चालवणारे खंडणीखोर यूट्युबर्सनी पत्रकारितेची अपरिमित हानी केली आहे. या 'अनैतिक' टीआरपीच्या स्पर्धेत टिकण्यासाठी या 'अनैतिक' पत्रकारितेची लागण मुख्य प्रवाहातल्या प्रसारमाध्यमांनीही स्वत:ला करून घेतली आहे. त्याचे परिणाम एखाद्याच्या खासगी आयुष्याचा सार्वजनिक कार्यक्रम बनवून चर्चा करत चघळत बसणे, चारित्र्यहननाच्या आरोपाबाबत एखाद्यावर मीडिया ट्रायल चालवण्याचे प्रकार आपल्याकडे नवे नाहीत.



समाजमाध्यमांना धरबंदच नसल्याने तिथे कोणीही कोणावरही चिखलफेक करू शकतो. या चिखलफेकीच्या खेळातून आपण कोणाचे आयुष्य उद्ध्वस्त करत आहोत, कोणाला आयुष्यातून उठवत आहोत, संबंधितांच्या 'नागरिक आणि व्यक्ती' म्हणून असलेल्या अधिकारात शिरण्याचा प्रयत्न करत आहोत, याचे भान समाजमाध्यमांनी बरेचदा गुंडाळून ठेवलेले असते, अशा प्रवृत्तीला विरोध केल्यास अभिव्यक्तीच्या नावाने गळे काढणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. सोशल मीडियावर अकाऊंट असल्यावर एखाद्याच्या व्यक्तिगत जीवनात विनाकारण, विनापरवानगी शिरकाव करणे किंवा एखाद्यावर आरोप करून चारित्र्यहनन करण्याचे प्रमाणपत्र आपल्याला मिळाले असल्याचा अविर्भाव समाजमाध्यमावर पहायला मिळतो. एखाद्याची जाहीर बदनामी केल्यावर 'तो' किंवा 'ती'चे आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते, त्या व्यक्तीचे करिअर, कुटुंब, नातेसंबंध, प्रतिष्ठा धुळीला मिळू शकते. त्यातून ती व्यक्ती स्वत:चे जगणे नाकारण्याची टोकाची भूमिका घेऊ शकते, याचे भान सोशल मीडियाची हाताळणी करणाऱ्यांना अनेकदा नसते, बरेचदा गंभीर, सुदृढ चर्चेपेक्षा थिल्लरपणा आणि जाहीर अवमान, मानहानी आणि अवहेलनेतच अनेकांना रस असतो. एखाद्याची वेदना, त्रासात आनंद घेणाऱ्यांना निश्चितच माणूस म्हणता येणार नाही. चारित्र्य ही व्यक्तीची संपूर्णपणे व्यक्तिगत बाब आहे. मात्र चारित्र्याच्या आपल्या संकल्पना या लैंगिक किंवा शारीरिक जाणिवेच्या पलीकडे जात नाहीत, त्यामुळे समाजमाध्यमांवर विकृत ट्रोलर्सच्या टोळ्यांना चघळायला खाद्य मिळते. सद्यस्थितीत महाराष्ट्रासमोर असलेले प्रश्न तुलनेने गंभीर आहेत. अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना हवालदिल केले आहे. कल्याण त्यानंतर पुणे अशा शहरांमध्ये लहानग्यांवरील अत्याचार आणि हत्येच्या घटना वाढल्या आहेत. त्याआधी परभणी प्रकरणातील आंदोलनकर्त्याचा मृत्यू अशा घटनांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेच्या विषयावर माध्यमांमध्ये गंभीर चर्चा होणे अपेक्षित होते. पण 'चारित्र्यहननाच्या' विषयावर माध्यमांचे पडदे आणि वर्तमानपत्रांचे रकाने भरून गेले आहेत. सिनेक्षेत्रातील रुपेरी वलयामुळे त्याकडे सामान्य वाचक किंवा प्रेक्षक आकर्षित होतो.

# मर्यादा पुरुषोत्तम डॉक्टर

भारतीय अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचा आत्मविश्वास सध्याच्या पंतप्रधानांकडून व्यक्त केला जात आहे, पण जेव्हा अशी वेळ आली होती की, भारताच्या अर्थव्यवस्थेची स्थिती अत्यवस्थ झालेली होती. देशाचे सोने विदेशात गहाण टाकण्यात आलेले होते. अशा परिस्थितीतून कसा मार्ग काढायचा असा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळी देशाचे पंतप्रधान असलेल्या पी.व्ही.नरसिंह राव यांनी अर्थव्यवस्थेला त्या अत्यवस्थ स्थितीतून बाहेर काढण्यासाठी तिच्यावर शस्त्रक्रिया करण्याची जबाबदारी त्यावेळचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्याकडे दिली. ती अतिशय गुंतागुंतीची शस्त्रक्रिया त्यांनी यशस्वीरित्या केली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था पुन्हा सुस्थितीत आली. एखादा मोठा निर्णय घ्यायचा असेल तर त्यासाठी तशा मोठ्या कुवतीचा माणूस लागतो. त्यावेळी भारताची संपूर्ण आर्थिक कोंडी झालेली होती. राजीव गांधी यांचा पाडाव करून सत्तेवर आलेल्या विश्वनाथ प्रताप सिंह आणि त्यानंतर चंद्रशेखर यांना एवढ्या मोठ्या देशाची जबाबदारी पेलणे अवघड गेले होते. त्यामुळे देशाची पुढील स्थिती अवघड झालेली होती. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. कुठल्याही देशाच्या राजकारणाचा अर्थकारण हा पाठकणा असतो, तो जर कमकुवत असेल तर देश उभा राहू शकत नाही. अशा स्थितीत मनमोहन सिंग यांनी अर्थव्यवस्थेवर शस्त्रक्रिया केली होती. त्यासाठी खूप मोठा निर्णय घ्यावा लागणार होता. जगाचे दरवाजे भारतासाठी उघडायचे होते. आपली अर्थव्यवस्था जगासाठी खुली करायची होती. उदारीकरणाचे म्हणजेच पर्यायाने जागतिकीकरणाचे धोरण अंमलात आणायचे होते. त्यासाठी धाडसी निर्णय घ्यावा लागणार होता. ती



ताकद आणि त्यासाठी लागणारी बुद्धिमत्ता अर्थमंत्री असलेल्या डॉ. मनमोहन सिंग यांच्याकडे होती. मनमोहन सिंग यांनी निर्णय घेतला आणि १९९१ साली भारतीय अर्थव्यवस्था जगासाठी खुली करण्यात आली. या निर्णयाच्या परिणामांबाबत देशातून विविध राजकीय विश्लेषकांनी, अर्थतज्ज्ञांनी, भारतातील उद्योजकांनी शंका उपस्थित केल्या होता. उद्या जर जगातील मोठ्या कंपन्यांनी भारतात शिरकाव केला, तर आपल्या देशातील उद्योगधंदे त्यात वाहून जातील, अशी भीती व्यक्त करण्यात येतील.

पान १ वरुन...

## प्राजक्ता माळीच्या तक्रारीनंतर...

सायबरच्या माध्यमातून त्यांच्याबद्दल केलेल्या अश्लिल विधानांची चाचपणी व्हावी आणि कारवाई व्हावी, असे निर्देश राज्य महिला आयोगाने मुंबई पोलिस आयुक्तांना पत्राद्वारे निर्देश दिले आहेत.' तसंच, संबंधित तक्रार अर्जाची आणि घटनेची चौकशी करावी आणि त्या अनुषंघाने कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल राज्य महिला आयोगाला सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य महिला आयोगामध्ये काम करत असताना सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक तक्रारी आल्या आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून झालेली बदनामी, अनेक कुटुंब उद्ध्वस्त होतात. सोशल मीडियामुळे फसवणूक आणि वाढलेल्या गुन्हेगारीची संख्या वाढली आहे. आम्ही अनेक उपाययोजना राबवत आहोत तरी त्यात काही यश आले नाही. यामुळेच अनेक महिला तक्रार करायला घाबरतात.

## मुंबईतील हवेचा दर्जा...

सध्या ही कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे. मुंबईतील सर्व २४ वार्डमध्ये ट्रक-माउंटेड फॉग मिस्ट कॅनन युनिट्स तैनात करण्यात आल्या आहेत. त्याशिवाय १०० हून अधिक टँकर रस्त्यावर साफसफाईसाठी तैनात असल्याची माहिती महानगरपालिकेने दिली आहे. विशेषत: बांधकाम पाडणे आणि उत्खनन सुरू असलेल्या ठिकाणांवर मुंबई महापालिकेने लक्ष केंद्रीत केलं आहे. तसेच प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्या २८ बांधकाम साइट्स शोधून त्यावरही कारवाई करण्यात आली आहे.

## 'डॉ. मनमोहन यांच्यावर...

अशा गौरवशाली नेत्याच्या अंत्यसंस्कारासाठी ज्या ठिकाणी त्यांचे स्मृतिस्थळ उभारले जाईल, अशाच ठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार व्हावेत, ही अत्यंत साधी आणि योग्य मागणी मान्य करण्यास मोदी सरकारने नकार दिला. हा त्यांच्या मनाचा कद्रूपणा व जळफळाट आहे,' असं ठाकरेंच्या पक्षाने म्हटलं आहे. 'डॉ. सिंग हे मोठे होतेच, पण त्यांच्या मृत्यूने मोदी व त्यांच्या सरकारला छोटे केले आहे. अर्थात सध्याच्या राज्यकर्त्यांना डॉ. मनमोहन सिंग यांची उंची कधीच गाठता येणार नाही. मनमोहन सिंग यांना जगभरातून श्रद्धांजली वाहण्यात आली. 'आम्ही आमचा प्रिय मित्र गमावला', असे रशिया, अमेरिका, चीनसारख्या राष्ट्रांनी म्हटले. आपल्या काळात डॉ. सिंग यांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष निवडणुकीत प्रचार केला नाही. नमस्ते बुश किंवा नमस्ते ओबामासारखे उत्सव साजरे केले नाहीत. जगातल्या कोणत्याही नेत्यास शिष्टाचार सोडून मिठ्या मारताना मनमोहन दिसले नाहीत. ते ताठ मानेने जगले. जगातल्या अनेक संसदीय सभागृहांत त्यांनी केलेली भाषणे गाजली. त्यात दूरदृष्टी, मार्गदर्शन व आत्मविश्वास होता. डॉ. सिंग यांना कधीच भाषणासाठी 'टेलिप्रॉम्प्टर'ची गरज भासली नाही व त्यांनी आपल्या वक्तव्यात कधीच अटलबिहारी, आडवाणी, गोळवलकर गुरुजी, डॉ. हेगडेवार यांचा अपमान केला नाही. १९८४ च्या दंगलीत शिखांचे हत्याकांड झाले. त्याबद्दल त्यांनी माफी मागितली. त्याचे खापर त्यांनी डॉ. हेगडेवार किंवा गोळवलकर गुरुजींवर फोडले नाही. डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यपद्धतीत पंडित नेहरूंचे प्रतिबिंब दिसत असे,' अशा शब्दांमध्ये 'सामना'तून मनमोहन सिंग यांच्या कार्यावर भाष्य केलं आहे.

## पालकमंत्रिपदावरुन शीतयुद्ध;...

त्यामुळे या जिल्ह्याचो पालकमंत्रिपद मिळवण्यासाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे आणि सातारा जिल्ह्यांना प्रत्येकी चार आणि कोल्हापूरला दोन अशी दहा मंत्रिपदे मिळाली आहेत. पुण्याच्या पालकमंत्रिपदासाठी पवार अत्यंत आग्रही असतात. गेल्या वेळीही पाटील यांच्याकडील पुण्याचे पालकमंत्रिपद त्यांनी स्वत:कडे घेतले होते. या वेळीही तेच पुण्याचे पालकमंत्री असू शकतील. साताऱ्यात चार कॅबिनेट मंत्री आहेत. त्यामुळे यापैकी एकाची वर्णी पालकमंत्रिपदी लागेल, अशी चर्चा आहे.

## मेलबर्न कसोटीत भारताचा...

अशा प्रकारे ऑस्ट्रेलियाने मेलबर्न कसोटी १८४ धावांनी जिंकली. बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये त्यांच्याकडे २-१ अशी आघाडी आहे आणि ते वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या विजेतेपदासाठी पात्र होण्याच्या जवळ आहेत. यशस्वी जैस्वाल बाद झाला की नाही, काही सांगता येणार नाही, मात्र तिसऱ्या पंचाने त्याच्याविरुद्ध निर्णय दिला. आकाशदीप झेलबाद झाल्याने स्निकोमीटर आणि थर्ड अंपायरच्या निर्णयावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले. बॅट पास केल्यानंतर स्निकोमीटरमध्ये स्पाइक आला, तरीही आकाशदीपला बाद घोषित करण्यात आले.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# ‘MMRDA’ चा मोठा निर्णय; प्रदूषण रोखणाऱ्या नियमांचे उल्लंघन केल्यास २० लाखांचा दंड

**मुंबई : राकेश गायकवाड**

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) वायू प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करत असून हवेचा दर्जा खालावल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. वायू प्रदुषणाला पायाभूत सुविधा विकास प्रकल्प आणि बांधकाम प्रकल्प कारणीभूत असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे आता अखेर पायाभूत सुविधा विकास प्रकल्पस्थळावरील वायू प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) राज्य सरकारच्या निर्देशानुसार पुढाकार घेतला आहे. त्यानुसार एमएमआरडीएकडून वायू प्रदूषण नियंत्रणासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. एमएमआरडीएच्या प्रकल्पस्थळी या नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारांविरोधात आता कठोर कारवाई केली जाणार आहे. नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदाराला ५ लाखांपासून २० लाखांपर्यंतचा दंड आकारण्यात येणार आहे. वायू प्रदूषणाची गंभीर समस्या लक्षात घेता एमएमआरडीएने बांधकामामुळे निर्माण होणाऱ्या वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी नियमावली आणि मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत. त्यानुसार आता एमएमआरडीएच्या प्रत्येक प्रकल्पस्थळावर आणि तेथील कामांवर नजर ठेवली जाणार आहे. प्रकल्पस्थळावरील राडारोड्याची विल्हेवाट योग्य प्रकारे लावली जात आहे का, प्रकल्पस्थळावरील वाहनांची वाहतूक नियमांनुसार केली जात आहे का, साफसफाई ठेवली जात आहे का अशा अनेक




बाबींची तपासणी नियमितपणे केली जाणार आहे. एमएमआरडीएच्या नियमावलीचे उल्लंघन करत वायू प्रदुषण करणाऱ्या कंत्राटदारांविरोधात कठोर कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी दंडात्मक कारवाईचा पर्याय एमएमआरडीएने निवडला आहे. त्यानुसार एमएमआरडीएच्या नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदाराला ५ लाखांपासून ते २० लाखांपर्यंतचा दंड आकारला जाणार असल्याची माहिती एमएमआरडीएकडून देण्यात आली आहे. एमएमआरचा विकास करताना पर्यावरणाचा कुठेही ऱ्हास होणार नाही याकडे लक्ष देण्यात येणार आहे. पुढच्या पिढीसाठी आरोग्यदायी वातावरण देण्यास आमचे सरकार वचनबद्ध असेल अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता सुधारणे हा आपणा सर्वांचा प्राधान्यक्रम आहे. बांधकामामुळे होणारे वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी एमएमआरडीएने हाती घेतलेल्या उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरतील असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा एमएमआरडीए अध्यक्ष एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. हवेची गुणवत्ता सुधारणे आणि ती अबाधित ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आमच्या प्रकल्पातील सर्व कंत्राटदारांनीही आता आपली जबाबदारी ओळखत स्वच्छ आणि प्रदुषणविरहीत मुंबईसाठी योगदान द्यावे, असे आवाहन महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी केले आहे.

## शुद्ध हवेसाठी गोरेगाववासियांची धडपड

**मुंबई : प्रथमेश चव्हाण**

मुंबईत हवा प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या जात असल्या तरी कोणत्या भागात हवेचा दर्जा खालावलेला आहे आणि तो का याकडे मात्र कोणी लक्ष देत नसल्याचे मत व्यक्त करून गोरेगाववासियांनी मागील अनेक दिवसांपासून ढासळलेल्या गोरेगाव तसेच आसपासच्या परिसरातील हवा गुणवत्तेकडे तातडीने लक्ष द्यावे व योग्य ती उपाययोजना करावी असलेल्या आरेच्या आतील भागात रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण केले जात आहे. त्यामुळे तेथे धुळीचे प्रचंड लोट पसरलेले असतात. सकाळपासून या परिसरात दृष्यमानता कमी असते. रस्त्यावरुन जाता येता इतक्या दिवसांत शुद्ध हवा अनुभवता आली नसल्याचा दावा तेथील नागरिकांनी केला आहे. हवेत धुळीचे प्रमाण जास्त आणि प्राणवायू कमी प्रमाणात अशी स्थिती असल्याचे रहिवाशांनी म्हटले



अशी मागणी केली आहे. गेले अनेक दिवस संपूर्ण मुंबईतील हवेचा दर्जा खालावला आहे. अनेक भागात सातत्याने ‘वाईट’ हवा नोंदली जात आहे. काही ठराविक परिसर सोडल्यास इतर भागातही हीच परिस्थिती असल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यात प्रामुख्याने गोरेगावमधील गोकुळधाम, साईबाबा कॉम्प्लेक्स, एनएनपी आणि मालाड पूर्व येथे नागरिकांना दूषित हवेला तोंड द्यावे लागत आहे. त्याचबरोबर आरे परिसरातही काहीशी हीच परिस्थिती असल्याचे सांगितले जात आहे. पर्यावरणीय दृष्ट्या महत्त्वाच्या आहे. दरम्यान, मुंबईतील हवा प्रदूषणाची वाढती पातळी लक्षात घेता. त्यावर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी गोरेगावमधील स्थानिक रहिवाशांनी केली आहे. त्याचबरोबर परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू आहेत. त्यावरही निर्बंध आणावेत, त्याशिवाय आम्ही शुद्ध हवा घेऊ शकत नाही असेही म्हटले आहे. दरम्यान, गेले अनेक दिवस मुंबईत हवा प्रदूषणाचे सत्र सुरूच आहे. यंदा मुंबईतील हवा गुणवत्तेत कोणतीही सुधारणा झालेली नाही. नोव्हेंबर महिन्यापासून हवेचा दर्जा ‘वाईट’च आहे.

## पत्राचाळीत म्हाडाची २६ मजली व्यावसायिक इमारत

**मुंबई : विशाल कारंडे**

गोरेगाव पश्चिम येथील सिद्धार्थनगर अर्थात पत्राचाळीच्या पुनर्विकासाअंतर्गत म्हाडाच्या मुंबई मंडळाला नऊ भूखंड विकासासाठी उपलब्ध झाले आहेत. त्या नऊपैकी चार भूखंडांवर २,३९४ घरे बांधली जाणार आहेत. मात्र आता मंडळाने उपलब्ध भूखंडांपैकी आर-५ भूखंडावर अनिवासी बांधकाम करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या भूखंडावर २६ मजली व्यावसायिक इमारत बांधली जाणार असून त्यातील गाळ्यांची विक्री भविष्यात ई लिलाव पद्धतीने केली जाणार आहे. यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यासह या प्रकल्पाचे नियोजन करण्याचे काम सध्या मंडळाकडून सुरू आहे.

वादग्रस्त पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प म्हाडाच्या मुंबई मंडळाकडे वर्ग झाल्यानंतर मंडळाने अर्धवट अवस्थेतील पुनर्वसित इमारतींसह म्हाडाच्या हिश्श्यातील ३०६ घरांचा समावेश असलेल्या इमारतीच्या कामाला सुरुवात केली. त्या दोन्ही इमारतींची कामे पूर्ण झाली असून आता केवळ निवासी दाखल्याची प्रतीक्षा आहे. उपलब्ध भूखंडावर अधिकाधिक गृहनिर्मिती करण्याचे म्हाडाने ठरवले असतानाच



आता आर-५ भूखंडावर व्यावसायिक इमारत बांधण्याचा विचार पुढे आला. त्यानुसार निर्णय घेत प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू असल्याची माहिती म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. म्हाडा अभिन्यासाच्या पुनर्विकासाअंतर्गत अर्थात ३३ (५) अंतर्गत पुनर्विकास करताना विकासासाठी उपलब्ध क्षेत्राच्या ६० क्षेत्रात अत्यल्प, अल्प आणि मध्यम गटांसाठी गृहनिर्मिती करणे बंधनकारक आहे. तर उर्वरित ४० टक्के क्षेत्रात उच्च गटासाठी घरे बांधण्यासह व्यावसायिक इमारती बांधण्याची मुभा आहे. त्यानुसार विकासासाठी उपलब्ध जागेच्या ८ टक्के जागेचा वापर व्यावसायिक बांधकामासाठी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या हा प्रकल्प अगदी प्राथमिक स्तरावर आहे. त्यामुळे तो नेमका कसा असेल हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल असेही त्यांनी सांगितले. एकूणच आता गोरेगावमध्ये म्हाडाकडून व्यावसायिक इमारत उभारत यातील गाळे विक्रीसाठी भविष्यात उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ डिजिटल; देशातील अन्य विद्यापीठांसाठी उपक्रम मार्गदर्शक

**मुंबई : नितीन देवळेकर**

राज्यातील विद्यार्थ्यांना डिजिटल पद्धतीने शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून पावले उचलण्यात आली आहे. त्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे डिजिटल विद्यापीठात रुपांतर करण्यात येणार आहे. डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचा राज्यातील हा पहिलाच प्रयत्न असून हा प्रयोग देशातील सर्व विद्यापीठांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात लवचिक, आकर्षक व दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात पहिले डिजिटल विद्यापीठ उभारण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने यशवंतराव चव्हाण मुक्त




विद्यापीठाची निवड केली आहे. डिजिटल विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा व्यासपीठ म्हणून वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये पहिले डिजिटल विद्यापीठ होण्याचा मान यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाला मिळणार आहे. डिजिटल विद्यापीठ स्थापन करताना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामधील तांत्रिक पायाभूत सुविधा वाढवणे, तसेच अन्य विद्यापीठांच्या तुलनेत या डिजिटल विद्यापीठात उच्च गुणवत्ता आणि आकर्षक विषय विकसित करण्यावर उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून भर देण्यात येणार आहे.

डिजिटल विद्यापीठाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यार्थ्याला लवचिक आणि सुलभ शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे डिजिटल विद्यापीठात रुपांतर करण्याचा राज्यातील हा पहिलाच प्रयत्न आहे. तसेच हे विद्यापीठ देशभरात डिजिटल शिक्षणासाठी एक नवीन मानक स्थापित करेल, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. विद्यापीठाअंतर्गत विद्यार्थ्यांना उत्तम आणि चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातील सर्व प्राध्यापकांना अध्यापनासाठी उच्च दर्जाचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामुळे ऑनलाईन वर्गातून विद्यार्थ्यांना प्रत्येक विषय सहज व सोप्या पद्धतीने शिकविणे प्राध्यापकांसाठी सहज शक्य होणार आहे.

## जात प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ; व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मराठा विद्यार्थ्यांना दिलासा

**मुंबई : सम्यक कासारे**

राज्य सरकारने मराठा समाजातील मुलांना सामाजिक व आर्थिक मागास प्रवर्ग (एसईबीसी) प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केल्यावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र देणे बंद केले. त्यामुळे ‘ईडब्ल्यूएस’ प्रवर्गातून व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ‘एसईबीसी’ प्रमाणपत्र सादर करण्यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) सक्ती करण्यात येत आहे. परिणामी अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश अडचणीत आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची होणारी अडचण लक्षात घेत जात प्रमाणपत्र सादर करण्यास दोन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी देण्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना मराठा समाजाच्या अनेक विद्यार्थ्यांनी आर्थिकदृष्ट्या



दुर्बल घटकातून प्रवेश घेताना ‘ईडब्ल्यूएस’ प्रमाणपत्र सादर केले. मात्र प्रवेश प्रक्रियेदरम्यान राज्य सरकारने मराठा समाजातील मुलांना ‘ईडब्ल्यूएस’ प्रमाणपत्र देणे बंद केले. त्याऐवजी ‘एसईबीसी’ प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली.

# प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेत ३५ लाख लाभार्थी!

**मुंबई : यश सावंत**

लाडकी बहीण योजना राज्याच्या विधानसभा निवडणुकीत खूप गाजली हे जरी खरे असले तरी गर्भवती माता व त्यांच्या नवजात बालकांचे तसेच स्तनदा मातेचे आरोग्य सुधारावे व त्यांना सकस पोषण आहार मिळून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी, या हेतूने राज्यात गेली अनेक वर्षे राबविण्यात येत असलेली प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचे महत्व खर्या अर्थाने जीवनदायी म्हणावे लागेल. या योजनेचा आतापर्यंत ३५ लाख २६ हजार २६५ मतांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

गरोदरपणात आणि बाळंतपणात महिलांना आरोग्य सेवा-सुविधा आणि प्रोत्साहनाच्या माध्यमातून कुपोषणाचा प्रभाव कमी करणे आणि माता व बाल आरोग्य सुधारणे हा प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत पहिल्या अपत्यासाठी दोन हप्त्यांत ५,००० रुपयांची मदत दिली जाते. पहिला हप्ता ३,००० रुपयांचा असून त्यासाठी राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या शासकीय आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आणि शेवटच्या मासिक पाळीच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आता किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी करणे आवश्यक आहे. दुसरा हप्ता २,००० रुपये असून त्यासाठी बाळाची जन्म नोंदणी आणि बालकास बीसीजी, ओपीव्ही झीरो, ओपीव्ही ३ मात्र, पेन्टाव्हॅलेन्टलसीच्य ३ मात्रा अथवा पर्यायी लसीकरणाचे प्राथमिक चक्र पूर्ण करणे आवश्यक आहे. दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर एक रकमी ६,००० रुपये मदत दिली जाते. त्यासाठी जन्म दाखला असणे आवश्यक असून बालकाचे पेन्टा ३ पर्यंतचे (१४ आठवडे) लसीकरण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे. प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत २०१७ ते मार्च २०२४ कालावधीत ३५,२६,२६५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे. केंद्र शासनाच्या १४ जुलै




२०२२ रोजीच्या पत्रानुसार प्रधानमंत्री मातृ वंदना योजना दोन ही नव्या स्वरुपात देशात लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये पूर्वी केवळ पहिल्या अपत्यासाठी लाभ मिळत असे, मात्र आता नवीन संकल्पनेनुसार १ एप्रिल २०२२ नंतर दुसरे अपत्य मुलगी जन्माला आल्यानंतरच्या लाभार्थीचा देखील या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. नवीन निकष पात्र लाभार्थी शोधून आशा किंवा अंगणवाडी सेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थीची ऑनलाइन पीएमएमव्हीवाय सॉफ्टवेअरमध्ये लाभार्थी नोंदणी केली जाते. लाभार्थी पहिल्या खेपेचा असेल तर दोन टप्प्यात फॉर्म भरला जातो. दुसऱ्या जिवंत अपत्याच्या वेळी मुलगी असणारे लाभार्थी असतील त्यांचे एकच टप्प्यात फॉर्म भरला जातो. याशिवाय पात्र लाभार्थी पोर्टलवर स्वतः लाभासाठी नोंदणी करू शकतात.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेंतर्गत गेल्या वर्षभरात जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यातील २,८२,२३९ लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून, सन २०२०-२१ मध्ये ५,४७,२१९, सन २०२१-२२ मध्ये ६,०९,९२१, सन २०२२-२३ मध्ये ५,२१,७५० आणि सन २०२३-२४ मध्ये १,१९,८२८ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहेत. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थी खालीलपैकी किमान एक गटातील असणे आवश्यक आहेत.ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी आहे. तसेच अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा ज्या महिला ४० टक्के किंवा पूर्णतः दिव्यांग आहेत. बीपीएल शिधापत्रिका धारक महिला. आयुष्मान भारत अंतर्गत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत महिला लाभार्थी. इ- श्रम कार्ड धारण करणाऱ्या महिला. किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी. मनरेगा जॉब कार्ड घेतलेल्या महिला.गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्ती. अन्नसुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत रेशनिंग कार्ड धारक महिलांना या योजनेचा लाभ मिळतो असे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

## मुंबईच्या मुलीनं रचला इतिहास; लहान वयातच केली जगातील सात उंच शिखरे सर

**मुंबई : गणेश बागडे**

मुंबईत नौदलाच्या शाळेत शिकणाऱ्या १७ वर्षीय काम्या कार्तिकेयनने लहान वयातच आगळा-वेगळा विक्रम स्वतःच्या नावावर नोंदविला आहे. काम्याने जगातील सात खंडातील सात उंच शिखरे सर केली आहेत. ही सात शिखरे सर करणारी ती सर्वात लहान वयाच पहिलीच मुलगी ठरली आहे. २४ डिसेंबर रोजी अंटार्क्टिकातील ‘माउंट विन्सन’ हे सर्वोच्च शिखर तिने सर करत सदर बहुमान पटकावला. माउंट विन्सनची चढाई करून काम्याने सेव्हन समिट हे आव्हान पूर्ण केले आहे. गिर्यारोहणमधील ही एक प्रतिष्ठित कामगिरी मानली जाते. काम्याचे वडील एस. कार्तिकेयन हे नौदलात कमांडर पदावर कार्यरत आहेत. त्यांच्याबरोबरीने काम्याने अंटार्क्टिका खंडातील १६,०५० फूट उंचीचे शिखर सर करत गिर्यारोहण क्षेत्रात स्वतःच्या कर्तुत्वाचा ठसा उमटविला. वयाच्या १३ व्या वर्षी काम्याने गिर्यारोहणाची मोहीम सुरू केली. तिने आतापर्यंत आफ्रिकेतील माउंट



किलीमांजारो, युरोपमधील माउंट एलब्रस, ऑस्ट्रेलियातील माउंट कोशियस्को, दक्षिण अमेरिकेतील माउंट एकोनकाग्वा, उत्तर अमेरिकेतील माउंट डेनाली, आशियातील माउंट एव्हरेस्ट आणि आता अंटार्क्टिका खंडातील माउंट विन्सन हे शिखर तिने सर केले.भारतीय नौदलाने एक्सवर पोस्ट शेअर करत काम्या आणि तिच्या वडिलांचे अभिनंदन केले आहे. भारत आणि नौदलासाठी हा अभिमानाचा क्षण असल्याचे या पोस्टमध्ये म्हटले आहे. काम्याने सर्वात लहान वयात सातही शिखरे सर करण्याचा बहुमान मिळवला आहे. अंटार्क्टिकामधील शिखर सर केल्यानंतर काम्याने तिचे हे यश जगभरातील तरुणांना समर्पित केले आहे. मुंबईतील नौदलाच्या ज्या शाळेत काम्या बारावीचे शिक्षण घेत आहे, त्या न्यू चिल्ड्रन स्कूलनेही काम्याचे कौतुक केले आहे. शाळेने केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, ‘इयत्ता बारावीत शिकणाऱ्या काम्याने सर्व अडथळे पार करत नवी उंची गाठली आहे. एनसीएस शाळेसाठी हा अभिमानाचा क्षण आहे.’

## उपाध्यक्ष दालन धक्काबुक्की प्रकरणी म्हाडामध्ये कर्मचाऱ्यांचे लेखणी बंद आंदोलन

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

म्हाडा भवनातील म्हाडा उपाध्यक्षांच्या दालनात धक्काबुक्कीचा प्रकार घडला असून एका रहिवाशाने महिला कर्मचाऱ्यास अपशब्द वापरल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकाराचा निषेध करण्यासाठी म्हाडा कर्मचाऱ्यांनी एक दिवसीय लेखणी बंद आंदोलनाची हाक दिली आहे. त्यानुसार आज (सोमवार, ३० डिसेंबर) कर्मचारी कोणतीही कामे करणार नसल्याने म्हाडा रहिवाशी, नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.

म्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या दालनात गुरुवारी दुपारी काही रहिवासी आपली समस्या घेऊन आले होते. आपल्या समस्येवर




सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी हे रहिवासी करीत होती. उपाध्यक्ष आणि अन्य अधिकारी एका महत्त्वाच्या बैठकीत व्यग्र होते. त्याच वेळी एका रहिवाशाने गोंधळ घातला. पुढे गोंधळ वाढत गेला आणि या रहिवाशाने आरडाओरड करत अधिकारी, सुरक्षा रक्षकांना धक्काबुक्की केली, असा आरोप म्हाडाच्या कर्मचाऱ्यांनी केला. या रहिवाशाने म्हाडा उपाध्यक्षांच्या कार्यालयातील एका महिला कर्मचाऱ्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांबद्दल अपशब्द वापरल्याचाही आरोप आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत जयस्वाल यांनी याप्रकरणी थेट गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महिला कर्मचाऱ्याने गुरुवारी खेरवाडी पोलीस ठाण्यात संबंधित रहिवाशाविरोधात गुन्हा दाखल केला. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पोलीस पुढील कार्यवाही करीत आहेत. असे असताना आता म्हाडा कर्मचारी यावरुन आक्रमक झाले आहेत. म्हाडा गृहनिर्माण कर्मचारी संघटना, म्हाडा मागासवर्गीय कर्मचारी संघटना, ग्रॅज्युएट इंजिनीयर्स असोसिएशन ऑफ म्हाडा या तीन संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. यासाठी सोमवार, ३० डिसेंबर रोजी एक दिवसीय लेखणी बंद आंदोलन पुकारले आहे.

# विशाल गवळीला दोन ते तीन महिन्यात होणार फाशी; मुख्यमंत्री फडणवीसांचं पीडितेच्या वडिलांना आश्वासन

**कल्याण : आकाश कांबळे**

कल्याण येथील चक्कीनाका भागातील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करत तिच्यावर लैंगिक अत्याचार करून खून केल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वी समोर आला होता. या प्रकरमातील मुख्य आरोपी विशाल गवळीला पोलिसांनी अटक केली आहे. विशाल गवळीने यापूर्वीही विनयभंगासारखे गुन्हे केले होते. पण मानसिक रुग्ण असल्याचे प्रमाणपत्र दाखवून यापूर्वी दोन वेळा न्यायालयातून जामीन मिळवल्याची माहिती पोलीस तपासात पुढे आली आहे. दरम्यान या अल्पवयीन मुलीची हत्या केल्यानंतर विशाल बुलढाणा येथे पळून गेला होता. त्याला तेथून पोलिसांनी अटक केल्यानंतर गुरुवारी सकाळी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाने विशाल आणि



त्याच्या पत्नीला दोन जानेवारीपर्यत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहे. दरम्यान या प्रकरणातील पीडितेच्या वडिलांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांना आरोपीला दोन-तीन महिन्यात फाशी होणार, असे आश्वासन दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर कल्याण येथील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणातील पीडितेच्या वडिलांची प्रतिक्रिया समोर आली आहे. ते म्हणाले की, 'मी मुख्यमंत्र्यांना विनंती केली की आरोपींना फाशी द्या. यावर मुख्यमंत्र्यांनी तुम्ही घाबरू नका, सरकार तुमच्या पाठीशी आहे. येत्या दोन ते तीन महिन्यात आरोपीला फाशी होणार असं सांगितलं आहे'. दरम्यान ही केस फास्ट ट्रॅकवर चालवली जाणार असून ज्येष्ठ वकील उज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नेमणूक करण्यासाठी चर्चा सुरू आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी पीडितेच्या वडिलांच्या भेटीदरम्यान त्यांना सांगितले आहे. विशाल गवळी हा दोन नंबरचा धंदा करायचा, मारण्याची धमकी द्यायचा,परिसरात विशालची होती दशहत अशी माहितीही पीडितेच्या वडिलांची माध्यमांशी बोलताना दिली आहे. दरम्यान विशाल गवळीने केलेल्या बालिकेच्या हत्येविषयी कल्याण परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# मिरा भाईंदराला आता विविध रंगांची ओळख, पालिकेने लागू केला 'कलर कोड'

**भाईंदर : सतिश सोनावणे**

मिरा भाईंदर शहराची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने कलर कोड ही संकल्पना राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार शहरातील विविध इमारती, वास्तू आदींना विशिष्ट रंग देण्यात येत आहे. या कलर कोडमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडेल आणि प्रत्येक वास्तू त्या विशिष्ट रंगाने ओळखली जाणार आहे. काही महिन्यांपूर्वी आयुक्त संजय काटकर यांच्या पुढाकाराने मिरा भाईंदर शहराची ओळख निर्माण करण्यासाठी परिषद आयोजित करण्यात आली होती. यात शहराच्या भौगोलिक, लोकसांख्यिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि कायदेशीर बाबीत सुधारणा आणण्यासाठी तज्ञांचा सल्ला घेण्यात आला



होता. या सर्व सल्ल्यानुसार 'सीटी ब्रॅण्डिंग' करण्याचे थोरण निश्चित करण्यात आले होते. महापालिका शहरातील नागरिकांसाठी विविध सोयीसुविधा निर्माण करत असते. त्यासाठी अनेक वास्तू, इमारती उभारल्या जातात. त्यात शाळा, सभागृह, सार्वजनिक शौचालय, रुग्णालय, मैदाने, उद्याने, रस्ते, दुभाजक, जलकुंभ व इतर अन्य गोष्टींचा समावेश असतो. मात्र या वास्तूंना वेगवेगळा रंग असायचा. त्यामुळे त्यांची स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी विशिष्ट रंग देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी कलर कोड लागू करण्यात आले आहे.

याबाबत माहिती देताना पालिकेते शहर अभियंता दिपक खांबित यांनी सांगितले की, शहरातील वास्तूंना यापूर्वी कोणतेही रंग देण्यात येत होते.

# महापालिकेच्या डास प्रतिबंधाच्या नियमास गृहसंस्थांचा विरोध, कारवाईला सामोरे जाण्याची तयारी

**ठाणे : तृप्ती गोरे**

ठाणे महापालिका क्षेत्रातील ५० पेक्षा अधिक सदनिका असलेल्या गृहसंकुलांनी अधिकृत पेस्ट कंट्रोल एजन्सी नेमून डास आळीनाशक औषधांची फवारणी करण्याचे परिपत्रक महापालिका प्रशासनाने काढल्यानंतर यास आता गृहनिर्माण संस्थेच्या संघटनेने विरोध केला आहे. परिपत्रकानुसार गृहसंकुलात डासांच्या आळ्या आढळल्यास दंडही भरावा लागणार आहे. महापालिकेच्या या परिपत्रकाचा गृहनिर्माण संस्थेच्या संघटनेने विरोध केला आहे. तसेच महापालिकेच्या कारवाईला देखील सामोरे जाण्याचा तयारी दर्शविली आहे. तसा ठरावच संघटनेने केला. संघटनेच्या या निर्णयास ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर यांनीही पाठिंबा दर्शविला आहे. महापालिकेच्या निर्णयामुळे आता वाद पेटण्याची चिन्हे आहेत.

दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह हौसिंग फेडरेशन आणि ठाणे जिल्हयाच्या सहकार विभागाच्या वतीने सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अधिवेशन भरविले होते. यावेळी गृहनिर्माण संस्थांचा पूनर्विकास, समस्या याविषयी संस्थांतील पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. ठाणे महापालिका क्षेत्रात डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी महापालिकेकडून फवारणी केली जाते. महापालिकेने नुकताच एक निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, ५० पेक्षा जास्त सदनिका असलेल्या गृहसंकुलांना स्वत:च डास प्रतिबंधक फवारणी करावी लागणार आहे. तसेच डासांच्या



आळ्या आढळल्यास दंडही भरावा लागणार आहे. महापालिकेने गृहनिर्माण संकुलांना नोटीसा देखील बजावल्या आहेत.

या निर्णयास दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह हौसिंग फेडरेशन या गृहनिर्माण संस्थेच्या संघटनेने विरोध केला. संमेलनामध्ये फेडरेशनचे महापालिकेच्या परिपत्रकाचा विषय निघाला. फवारणीचा खर्च उचलणार नाही. गुन्हा दाखल झाल्यास त्यास आम्ही तयार आहोत. लोकप्रतिनिधींनी हा विषय प्राधान्यांने मांडायला हवा असे ते म्हणाले. यास खासदार नरेश म्हस्के आणि आमदार संजय केळकर यांनीही पाठिंबा दिला. फवारणी करण्यासाठी महापालिका पत्रक काढत असेल तर नागरिकांनी हे पैसे भरू नका असे म्हस्के म्हणाले. असे परिपत्रक महापालिकेने तातडीने रद्द केले पाहिजे. याबाबत महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. तातडीने हे परिपत्रक रद्द करून घेऊ असेही केळकर म्हणाले.

कचरा, मलनिस्सारण वाहिन्या, रस्ते आम्हीच स्वच्छ करायचे. आता डासांचा प्रतिबंधही आम्ही करायचा, मग महापालिका केवळ दंड लावून कर घेणार का? ठाणे महापालिकेच्या निर्णयाला आमचा पूर्णत: विरोध आहे. कोकण विभागातील गृहनिर्माण संस्थेच्या तक्रारींपैकी ८० टक्के तक्रारी या ठाणे जिल्ह्यातील असतात. यामध्ये निवडणुक, परिक्षण, विशेष सभा, पूर्नविकास या विषयांवरील तक्रारी अधिक आहेत.

# शिळफाटा रस्त्यावर अभूतपूर्व वाहतूक कोंडी

**डोंबिवली: सुचिता देशमुख**

नवीन वर्षाचा जल्लोष साजरा करण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने आपली खाजगी वाहने घेऊन बाहेर पडली आहेत. या वाहनांमध्ये मालवाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांची भर पडल्याने कल्याण शिळफाटा रस्त्यावर रविवारी अभूतपूर्व वाहतूक कोंडी झाली होती. या वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी पत्रीपूल ते शिळफाटा कल्याण नाका दरम्यान वाहतूक पोलीस आणि वाहतूक सेवक तैनात आहेत. वाहतूक सेवकांना पुढे करून वाहतूक पोलीस रस्त्याच्या कडेला उभे राहून वाहतुकीचे नियोजन करत आहेत. वाहतूक सेवकांना रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी आणि चौकात चारही बाजूने येणारी वाहतूक नियंत्रित करणे आणि ही वाहने नियोजन करून सोडणे



वाहतूक पोलिसांच्या नियंत्रणा बाहेर जात असल्याने शिळफाटा रस्ता वाहतूक कोंडीत अडकत असल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून करण्यात येत आहेत. वाहतूक सेवकांना वाहतूक नियोजनाचे पहिले प्रशिक्षण देण्यात यावे आणि नंतरच त्यांना वाहतूक नियोजनासाठी शिळफाटा रस्त्यावर उभे करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

गेल्या काही महिन्यांपासून शिळफाटा रस्त्यावर दररोज सकाळ, संध्याकाळ वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवासी त्रस्त आहेत. या रस्त्यावर चौका चौकात वाहतूक पोलीस तैनात असतात. बहुतांशी वाहतूक सेवक वाहतुकीचे नियोजन करण्यापेक्षा दुचाकी, मालवाहू वाहने, चारचाकी वाहने अडवून त्यांची कागदपत्रे तपासण्यातच वेळ घालवत आहेत. या कालावधीत त्या रस्त्यावर आणि चौकात वाहतूक कोंडी होते, अशा तक्रारी प्रवाशांनी केल्या. कोळसेवाडी वाहतूक पोलीस विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर यांनी सांगितले, नवीन वर्षामुळे नागरिक मोठ्या प्रमाणात रस्त्यावर बाहेर आले आहेत. मॉलमध्ये खरेदीसाठी झुंबड उडाली आहे. ही वाहने एकाच वेळी रस्त्यावर आल्याने शिळफाटा रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. ही कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलीस तत्पर असतात. वाहतूक सेवकही वाहतूक नियोजनाची जबाबदारी चोखपणे पार पडत आहेत.

# पिरवाडी ते केगाव सागरी मार्ग जून २०२५ पर्यंत; उरण मधील दोन किनारे जोडल्याने किनाऱ्याची धूपही थांबणार

**उरण : भावना जैन**

प्रसिद्ध पिरवाडी किनारा ते केगाव असा १.२०० मीटर लांबीचा सागरी मार्ग तयार केला जात आहे. हा मार्ग जून २०२५ पर्यत पूर्ण होणार आहे. त्यामुळे उरण मधील पिरवाडी व केगाव हे दोन समुद्र किनारे जोडले जाणार आहेत. तसेच समुद्राच्या महाकाय लाटांमुळे होणारी किनाऱ्याची धूप ही थांबण्यास मदत होणार आहे. याचा फायदा या दोन्ही किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांच्या वाढीस मदत करतील. त्याचप्रमाणे येथील नागरिकांची नित्याच्या कोंडीतून सुटका होणार आहे.

हा सागरी मार्ग व्हावा यासाठी ग्रामपंचायतीने मागणी केली होती. त्यानुसार मेरिटाईम बोर्डाकडून याची उभारणी केली जात आहे. पिरवाडी व केगाव हे दोन समुद्र किनारे उरण मध्ये आहेत. यातील केगाव किनारा अनेकांना माहीत नाही. मात्र या सागरी मार्गामुळे केगाव किनाऱ्यावरील पर्यटकांच्या संख्येत ही वाढ होण्याची शक्यता आहे. हा मार्ग दोन टप्प्यात तयार करण्यात येणार आहे. यात पहिल्या टप्प्यात ५५० मीटर ते तर दुसऱ्या टप्प्यात ६५० मीटर लांबीचा असेल यासाठी एकूण १० कोटी ५० लाख रुपये खर्च येणार आहे. पिरवाडी ते केगाव



या सागरी किनारा मार्गामुळे या किनाऱ्याची समुद्राच्या महाकाय लाटापासून संवर्धन होऊन धूप थांबविण्यास ही मदत होणार आहे. त्यामुळे हा मार्ग महत्वाचा ठरणार आहे. गेल्या अनेक वर्षापासून नागाव व केगाव मधील समुद्र किनाऱ्याची लाटांमुळे धूप होत आहे. परिणामी येथील भात शेती व इतर पिकांना याचा फटका बसत आहे. समुद्रकिनारी असलेल्या भात शेतीत समुद्राचे खारे पाणी शिरून येथील भात शेती नापिकी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच येथील गोड्या पाण्याच्या विहिरी च्या पाण्यावर ही परिणाम जाणवू लागला आहे. या मार्गामुळे बंधारा मजबूत होऊन नागाव व केगाव मधील शेती आणि पाण्याचे संवर्धन होण्यासही मदत होणार आहे. सध्या केगाव आणि परिसरात जाण्यासाठी उरण शहरातून जावे लागत आहे.

# टिवरी ग्रामपंचायतीचा इव्हीएमला विरोध, मतपत्रिकेवर निवडणूक घेण्याचा ठराव मंजूर

**वसई : सुचिता देशमुख**

नुकताच महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीचा निकाल अनपेक्षित आणि धक्कादायक लागल्यानंतर इव्हीएम मतमोजणीवर शंका उपस्थित करण्यात आली होती. याच पार्श्वभूमीवर वसईतील टिवरी ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांनी देखील इव्हीएम मशीन हद्दपार करा असे म्हणत मतपत्रिकेवर ( बॅलेट पेपरवर) मतदान घेण्याचा ठराव पारित केला आहे. या ठरावाला गावच्या पोलीस पाटील यांनी नदेखील अनुमोदन दिले असून हा टिवरी ग्रामपंचायतीचा ऐतिहासिक ठराव जिल्हा स्तरावर सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. महिना भरा पुर्वी विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले होते. त्यानंतर लागलेल्या अनपेक्षित निकालामुळे राज्यभरात इव्हीएम मशीन मधील मतमोजणीचा मुद्दा प्रचंड गाजला आहे. केवळ लोकप्रतिनिधीच नव्हे तर मतदान केलेल्या मतदारांच्या तोंडीही इव्हीएम मतमोजणीवर प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.सोलापूरातील मारकडवाडीतल्या ग्रामस्थांनी बॅलेट पेपरवर निवडणुका घेत इव्हीएम मतमोजणीला आव्हान दिले होते. त्या पाठोपाठ आता वसईतील टीवरी ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांनी सुद्धा इव्हीएम यंत्रावर आक्षेप घेत मतपत्रिकेवर निवडणुका झाल्या पाहिजेत अशी भूमिका घेतली आहे. नुकताच टीवरी ग्रामपंचायतची ग्रामसभा पार पडली. यावेळी गावातील शेकडो ग्रामस्थ ग्रामसभेला जमले होते.या सभेत इव्हीएम



मशीनविरोधात एकमत दाखवत मतपत्रिकेवर मतदान घेण्याचा ठराव पारित केला आहे. दरम्यान, टिवरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच नुतनकुमार भोईर यांच्या अध्यक्षतेखाली, माजी उपसरपंच नंदकुमार चौधरी हे सूचक असलेल्या ग्रामसभेत टिवरी ग्रामस्थांनी एकमताने इव्हीएम हटावचा नारा देत मतपत्रिकेवर मतदान घेण्याचे एकमताने मंजूर केले आहे. तसा ठराव पारित झाला असून या ठरावाला गावचे पोलीस पाटील अजित भोईर यांनी अनुमोदन दिले आहे.असा ठराव करणारी टिवरी ग्रामपंचायत पालघर जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

# लोटस पाणथळ तलावाला 'डेब्रिज'चा विळखा; पाणथळ यादीत असलेल्या तलावाकडे पालिकेचे दुर्लक्ष

**नवी मुंबई : धनश्री सट्टा**

ठाणे व नवी मुंबई शहरांमध्ये खाडीकिनारा तसेच पाणथळींचे प्रमाण अधिक असून एकीकडे पर्यावरणप्रेमी पाणथळ जागा संरक्षित करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असताना दुसरीकडे नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीत असलेल्या पाणथळींकडे पालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. टीएस चाणक्य, डीपीएस तलाव व एनआरआय पाणथळ जागा संरक्षित करण्यासाठी प्रयत्न होत असताना सीवूड्स सेक्टर २७ येथील लोटस पाणथळ तलावाला 'डेब्रिज'चा विळखा पडू लागला आहे. त्याबद्दल पर्यावरणप्रेमी नाराजी व्यक्त करत असून राडारोडा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय पाणथळ सर्वेक्षणात महाराष्ट्रात ५६४ पाणथळ जागांचा समावेश आहे.तर ठाणे जिल्ह्यात १९ पाणथळ जागांचा समावेश असून त्यात लोटस तलावाचा उल्लेख आहे. सीवूडस सेक्टर २७, येथील लोटस तलाव परिसरात डेब्रिज टाकले जात आहे. तलाव परिसरात छुप्या पद्धतीने हा राडारोडा टाकला जात आहे. तलावाच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष केले जात



आहे. पाणथळ जागा संरक्षित करण्यासाठी पर्यावरणप्रेमी प्रयत्नशील असताना पालिका पाणथळ तलावाकडे दुर्लक्ष केले जाते. नवी मुंबई महापालिकेच्या वतीने डेब्रिज टाकणाऱ्यांवर डेब्रिज भरारी पथकामार्फत कारवाई केली जाते. मात्र या पाणथळ तलावाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे आहे. तत्कालिन आयुक्त अभिजीत बांगर यांनी या तलाव परिसराला भेट देऊन कार्यवाहीही केली होती. परंतु मागील काही दिवसांपासून प्लास्टिकच्या पोत्यात भरुन तलाव परिसरात डेब्रिज टाकले जात आहे. त्यामुळे पालिकेने या ठिकाणी तात्काळ कारवाई करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे. सीवूडस सेक्टर २७ कमळ जलाशयात डेब्रिज टाकून ते बुजवण्याचा प्रयत्न सुरू आहे. पालिकेचे डेब्रिज भरारी पथक दुर्लक्ष करते. लोटस तलाव हा नवी मुंबईतील पाणथळ यादीत समाविष्ट असताना पालिका त्याकडे दुर्लक्ष करते. या तलावाच्या परिसरात टाकल्या जाणाऱ्या डेब्रिज तसेच अनधिकृत बांधकामांबाबत याचिका प्रलंबित आहे. पाणथळ जागांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. लोटस तलावाचेही पाणथळ तलाव म्हणून सर्वेक्षण करण्यात आले आहे.

# ठाण्यातील खारफुटी नष्ट करणाऱ्या अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल

**ठाणे : तृप्ती गोरे**

येथील बाळकूम भागात डेब्रीज टाकल्यामुळे हेक्टभर खारफुटी नष्ट झाली.याप्रकरणी म्युझ फाऊंडेशनने महाराष्ट्र वन विभागाच्या खारफुटी विभागाकडे तक्रार नोंदावली होती. या तक्रारीच्या आधारे ठाणे महसूल विभागाने कापूरबावडी पोलीस ठाण्यात दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बाळकूम – कोलशेत परिसरात डेब्रीज टाकून जमीन समतल करण्याचे काम गेले अनेक वर्षापासून सुरु होते. याची माहिती पर्यावरणप्रेमींनी म्युझ फाऊंडेशन या संस्थेला दिली. या संस्थेच्या सदस्यांनी डेब्रीज घेऊन येणाऱ्या ट्रक हालचालींचे दस्तऐवजीकरण केले. एप्रिल २०२१ मध्ये, ठाणे महापालिकेने खारफुटी शेजारील रस्त्यावर मोठे ट्रक जाण्यापासून रोखण्यासाठी उंचावरील अडथळे बांधले होते. परंतू, त्यावेळी अज्ञात व्यक्तींनी हे अडथळे काढून टाकले होते.

यासंदर्भात, महाराष्ट्र वन



विभागाच्या खारफुटी विभागाकडे तक्रार नोंदविल्यानंतर म्युझ फाउंडेशनने वन विभागाच्या खारफुटी विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर, ठाणे महसूल विभागाने कापूरबावडी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# महापालिकेचा १४ वर्षांचा 'वनवास' संपला; ग्रामपंचायत काळातील १८९ मालमत्ता झाल्या नावावर

**वसई : सतिश सोनावणे**

वसई विरार महापालिकेच्या स्थापनेनंतर १४ वर्षानंतर पालिकेचा वनवास संपला आहे. ग्रामपंचायत काळापासून असलेल्या १८९ मालमत्ता पालिकेच्या नावावर झाल्या आहेत. महसूल विभागात सातबारा उताऱ्यावर या मालमत्तांवर पालिकेचे अधिकृत नाव आहे आहे. याशिवाय पालिकेने ५० भूखंड शोधले असून त्यांना कुंपण घालून ते संरक्षित केले आहेत.

वसई विरार महापालिकेची स्थापना ३ जुलै २००९ रोजी झाली. त्यापूर्वी वसई तालुक्यात ४ नगरपरिषदा आणि ५२ ग्रामपंचायती अस्तित्वात होत्या. महापालिका स्थापन झाली तेव्हा या सर्व ग्रामपंचायती आणि नगरपरिषदा महापालिकेत विलीन झाल्या होत्या. मात्र ग्रामपंचायतीच्या नावावर असलेल्या मालमत्ता पालिकेच्या नावावर नव्हत्या. त्यात ग्रामपंचायतीची कार्यालये, समाजमंदिरे, विभागीय कार्यालये, विविध वास्तू, मैदाने, मोकळ्या जागा, रस्ते आदींचा समावेश होता. त्यामुळे अनेकदा कायदेशीर अडचणी येत होत्या. सत्ता महापालिकेची मात्र मालमत्ता ग्रामपंयायतीचा अशी परिस्थिती होती. एकूण २५१ मालमत्ता या ग्रामपंचायतीच्या नावावर होत्या. त्यामुळे मागील वर्षी पालिकेने मालमत्ता विभाग



स्थापन केला होता. त्यानुसार या सर्व मालमत्ता शोधून त्यांच्या सातबारावर पालिकेचे नाव चढविण्यात आले आहे. २५१ पैकी १८९ मालमत्तांची महसूल दप्तरी महापालिकेच्या नावाची नोंद करण्यात आली असून उर्वरित मालमत्तांच्या नोंदी करण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त नानासाहेब कामठे (मालमत्ता) यांनी दिली.

वसई विरार महापालिका शहराचे एकूण ४२० हेक्टर क्षेत्रफळ आहे. पालिकेच्या मालकिच्या एकूण ८५२ मालमत्ता आहेत. याशिवाय त्यात राज्य शासन, गुरूचरण विभाग, तसेच ग्रामपंचायत आणि नगरपरिषदांच्या मालकिच्या जागा होत्या. पालिकेच्या स्थापनेनंतर ग्रामपंचायत आणि नगरपरिषदांच्या जागा महापालिकेच्या अखत्यारित आल्या होत्या. पण त्यांचे सातबारे उतारे पालिकेच्या नावावर हस्तांतरीत झाले नव्हते. पालिकेने अशा ६६ भूखंड सर्वेक्षणानंतर शोधून काढले आहेत. याशिवाय जिल्हाधिकाऱ्यांकडून पालिकेला १४ भूखंड मिळाले आहेत. असे एकूण ५० भूखंड पालिकेला मिळाले आहे. या भूखंडांना कुंपण घालून ते देखील संरक्षित करण्यात येत असल्याची माहिती उपायुक्त कामठे यांनी दिली. या भूखंडांची किंमत बाजारभावानुसार कोट्यवधींच्या घरात आहे.

# राज्यात हिवतापाच्या रुग्णांमध्ये घट तर डेंग्यूच्या रुग्णांमध्ये किंचित वाढ

**■ मुंबई : राकेश गायकवाड**

**हिवताप व डेंग्यूचे रुग्ण साधारणपणे पावसाळयात मोठ्या प्रमाणात सापडतात. मात्र वातावरणातील बदलामुळे यावर्षी संपूर्ण वर्षभर अधूनमधून रुग्ण सापडले आहेत. त्यामुळे यंदा गतवर्षीच्या तुलनेत डेंग्यूच्या रुग्णांमध्ये किंचित वाढ झाली असली तरी हिवतापाच्या रुग्णांमध्ये घट झाली आहे. मात्र हिवताप व डेंग्यूमुळे मृत्यू होण्याच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे.**

हिवतापाला प्रतिबंध करण्यासाठी राज्य सरकारकडून विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. या उपाययोजनांना काहीअंशी यश येत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात २०२४ मध्ये हिवतापाचे १५ हजार ६७० रुग्ण सापडले. तर १८ जणांचा मृत्यू झाला. गतवर्षी हिवतापाचे १९ हजार ९६८ रुग्ण सापडले असून, २३ जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे यंदा गतवर्षीच्या तुलनेत रुग्णांच्या संख्येत साधारण ४ हजाराची घट झाली. तसेच मृतांची संख्याही कमी झाली आहे. मुंबईत सर्वाधिक ७ हजार ८०६ रुग्ण सापडले तर त्याखालोखाल गडचिरोलीमध्ये ६ हजार ५७६ रुग्ण सापडले आहेत. तसेच हिवतापाने सर्वाधिक १३ मृत्यू गडचिरोलीमध्ये झाले आहेत. त्याखालोखाल मुंबईत ५ जण, रायगडमध्ये दोन आणि ठाण्यात



एकाचा मृत्यू झाला आहे. हिवतापाच्या रुग्णांमध्ये घट झाली असली तरी डेंग्यूच्या रुग्णांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा किंचित वाढ झाली आहे. मात्र मृतांच्या संख्येत घट झाली आहे. राज्यात २०२४ मध्ये डेंग्यूचे १९ हजार १६० रुग्ण सापडले तर २६ जणांचा मृत्यू झाला आहे. मात्र गतवर्षी राज्यात डेंग्यूचे १९ हजार ३४ रुग्ण सापडले होते, तर ५५ जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे यंदा डेंग्यूच्या रुग्णांमध्ये १२६ इतकी वाढ झाली असली तरी मृत्यूला अटकाव करण्यात आरोग्य विभागाला काहिसे यश मिळाले आहे. डेंग्यूचे सर्वाधिक म्हणजे ५ हजार ८५१ रुग्ण मुंबईत सापडले असून, त्याखालोखाल कोल्हापूरमध्ये १ हजार २३८ रुग्ण, नाशिक शहरात १ हजार १९५ रुग्ण, रायगडमध्ये ७३७ रुग्ण, पालघरमध्ये ५६५ रुग्ण, साताऱ्यामध्ये ५४२, नागपूरमध्ये ४४६ रुग्ण, चंद्रपूरमध्ये ४२५ रुग्ण सापडले. तसेच डेंग्यूने सर्वाधिक म्हणजे पाच मृत्यू मुंबईत झाले. त्याखालोखाल रायगडमध्ये चार जणांचा आणि लातूर व नागपूरमध्ये प्रत्येकी दोघांचा मृत्यू झाला. राज्यात चिकुनगुन्याच्या रुग्णांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा वाढ झाली आहे. जानेवारीपासून आतापर्यंत राज्यात चिकुनगुन्याचे ५ हजार ७५७ इतके रुग्ण सापडले तर गतवर्षी १ हजार ७०२ रुग्ण सापडले होते. २०२४ मध्ये चिकुनगुन्याचे सर्वाधिक म्हणजे १ हजार ८८ रुग्ण नागपूरमध्ये सापडले. त्याखालोखाल पुण्यात ७५१ रुग्ण, मुंबईत ७३५ रुग्ण सापडले.

## सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात प्रथम; दररोज सरासरी ८४४ शेतकऱ्यांना लाभ

**■ मुंबई : प्रथमेश चव्हाण**

शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स आणि कृषी पंप असा संपूर्ण संच देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. या योजनेच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात पेंडिंग) प्रश्न सोडविण्याचा निर्धार त्यांनी केला असून त्यानुसार या योजनेला गती देण्यात आली आहे.

संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठल्याचे लोकेश चंद्र यांनी सांगितले. या योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती



दररोज सरासरी ८४४ पंप राज्यात बसविण्यात आल्याची माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी दिली. राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्यात साडेदहा लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दिष्ट्य ठेवले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दीर्घकाळ पैसे भरूनही पंप मिळाले नसल्याचा (पेड केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे.

## रायगड जिल्ह्यात पहिले शासकिय युनानी महाविद्यालय; राज्य सरकारचा निर्णय

**■ मुंबई : विशाल कारंडे**

महाराष्ट्रात शासकीय अनुदानित तीन व खाजगी विनाअनुदानित चार अशी एकूण सात युनानी महाविद्यालये आहेत. मात्र एकही शासकीय युनानी महाविद्यालय नसल्याने राज्यात शासकीय युनानी महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून पहिले महाविद्यालय रायगड येथे सुरू करण्यात येणार आहे. १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे व संलग्नित १०० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात युनानी पदवी अभ्यासक्रमाची (बीयूएमएस) तीन शासकीय अनुदानित व चार खाजगी विनाअनुदानित अशी एकूण सात महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांमधील एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमता ४२० इतकी आहे. तथापि, राज्यात एकही शासकीय युनानी महाविद्यालय अस्तित्वात नाही. त्यामुळे राज्यात






रायगडमधील म्हसळा तालुक्यातील सावर येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय युनानी महाविद्यालय व संलग्नित १०० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मार्च २०२४ मध्ये मान्यता दिली होती. दरम्यान, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेच्या मानकानुसार नवीन युनानी महाविद्यालय सुरू करण्यासाठी किमान १ वर्षापासून कार्यरत रूग्णालय असणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन शासकीय युनानी महाविद्यालय सुरू करण्यासाठी रायगड जिल्हयातील म्हसळा तालुक्यातील रुग्णालये तात्पुरत्या स्वरूपात किमान ३ वर्षासाठी वापरण्यास वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने मान्यता दिली आहे. त्यामुळे रायगड जिल्हयात युनानी महाविद्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या नवीन युनानी महाविद्यालयाबरोबरच १०० खाटांचे नावे रूग्णालय सुद्धा उभारण्यात येणार आहे.

## लहरी हवेचा फळबागांना फटका

**■ छत्रपती संभाजीनगर / अलिबाग : गणेश बागडे**

गेल्या काही दिवसांत राज्यात असलेल्या ढगाळ हवेचा फटका फळबागांना बसला आहे. फळगळती, मंगू रोगाचा प्रादुर्भाव यामुळे मराठवाड्यात मोसंबी उत्पादक चिंतेत आहेत. तर मळभ, ओसरलेली थंडी आणि अवकाळी पावसाचा आंब्यावर परिणाम होण्याची भीती कोकणातील बागायतदारांना सतावत आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना व बीडच्या काही भागांत मिळून ४१ हजारांवर हेक्टरपर्यंतचे मोसंबीचे क्षेत्र आहे. मात्र मराठवाड्यात मागील आठ ते दहा दिवसांपासून थंडी गायब झालेली असून सकाळच्या वेळात ढगाळ वातावरण असते. त्यामुळे मोसंबीची फळगळती होत असून अनेक भागांमध्ये मंगू रोगाचाही प्रादुर्भाव झाला आहे. यामुळे संपूर्ण फळ हिरव्याऐवजी काळ्या रंगाने मिश्रित दिसते आहे. परिणामी त्याला बाजारपेठेत हातही लावला जात नाही. या



फळाला टनामागे चार-साडेचार हजार रुपयांचाच दर मिळत असल्याचे उत्पादक विश्वंभर हाके यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील पाचोड बाजारपेठेत मोसंबीला टनामागे साधारणपणे १० हजार रुपये मिळाले. आठ-दहा दिवसांपूर्वी हाच दर २५ हजारांच्या घरात असल्याचे व्यापारी मुजफ्फर शेख यांनी सांगितले. दुसरीकडे कोकणातही फळांच्या राजाला लहरी हवेचा फटका बसत असल्याचे चित्र आहे. ढगाळ हवेमुळे तुडतुडे, पांढरी माशी, मावा या अळ्यांचा प्रादुर्भाव होत आहे. ढगाळ हवेमुळे आर्द्रता वाढून तुडतुड्या आणि करपा रोगाचा धोका आहे. ओसरलेली थंडी आणि येत्या दोन दिवसांत पाऊस पडण्याचा अंदाज यामुळे आंब्यावर तिहेरी संकट कोसळण्याची धास्ती आहे. अवकाळी पाऊस झाल्यास त्याचा मोठा फटका मोहोराला बसू शकतो. आधीच उशिरा सुरू झालेल्या थंडीमुळे हंगाम लांबला असतानाच या संकटांमुळे उत्पादनावर परिणाम होण्याची भीती आहे.

## डीआरपीपीएल नव्हे आता एनएमडीपीएल, धारावी पुनर्विकास प्रकल्प साकारणाऱ्या कंपनीच्या नावात अचानक बदल

**■ मुंबई : आकांक्षा नार्वेकर**

आशियातील सर्वात मोठ्या झोपडीपट्टीचा, धारावीचा कायापालट धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत करण्यात येणार आहे. या पुनर्विकासासाठी राज्य सरकार आणि अदानी समुह यांच्या संयुक्त भागीदारीत धारावी रिडेव्हलमेन्ट प्रायव्हेट लिमिटेड (डीआरपीपीएल) नावाची कंपनी स्थापन करण्यात आली आहे. मात्र आता अचानक या कंपनीचे नाव बदलण्यात आले आहे. डीआरपीपीएलऐवजी आता या कंपनीचे नाव एनएमडीपीएल करण्यात आले आहे. १२ डिसेंबर रोजी डीआरपीपीएलच्या संचालक मंडळाच्या एका बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. तर १७ डिसेंबरपासून डीआरपीपीएलचे नाव नवभारत मेगा डेव्हलपर प्रायव्हेट लिमिटेड (एनएमडीपीएल) असे झाले आहे.

धारावी पुनर्विकासाच्या निविदा प्रक्रियेत अदानी समुहाने बाजी मारली आहे. त्यानुसार अदानी समुहाकडून धारावीचा पुनर्विकास केला जात आहे. या पुनर्विकासाअंतर्गत सध्या धारावीतील बांधकामांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्यानंतर रहिवाशांची पात्रता निश्चिती केली जाणार आहे. लवकरच या प्रकल्पाला वेग दिला जाण्याची शक्यता आहे. अशा या पुनर्विकासासाठी महाराष्ट्र राज्य सरकार आणि अदानी समूह यांच्या संयुक्त भागीदारीने धारावी रिडेव्हपलमेन्ट प्रायव्हेट लिमिटेड अर्थात डीआरपीपीएल नावाने कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. या कंपनीत अदानी समुहाचा ८० टक्के तर राज्य सरकारचा २० टक्के हिस्सा आहे. या कंपनीवर धारावी पुनर्विकासाची संपूर्ण जबाबदारी आहे. त्यानुसार या कंपनीच्या माध्यमातूनच सध्या धारावीत सर्वेक्षणासह अन्य कामे



केली जात आहेत. असे असताना आता अचानक डीआरपीपीएलचे नाव बदलण्यात आले आहे. डीआरपीपीएलऐवजी एनएमडीपीएल असे नाव आता कंपनीस देण्यात आले आहे. अदानी समुहातील सूत्रांनी यास दुजोरा दिला आहे. नवभारत मेगा डेव्हलपर प्रायव्हेट लिमिटेड म्हणजेच एनएमडीपीएल अशी आता या कंपनीची नवी ओळख १७ डिसेंबरपासून लागू झाली आहे. एनएमडीपीएलकडून डीआरपीपीएलच्या सर्व संचालकांना कळविण्यात आले आहे. एनएमडीपीएल ही नवीन कंपनी नसून अदानी समुहाची यापूर्वीचीच २३ ऑगस्ट २०२३ ची जूनी कंपनी आहे. दरम्यान १७ डिसेंबरला नाव बदलण्यात आले असताना डीआरपीपीएल, धारावी पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी) वा राज्य सरकार कोणाकडूनही यासंबंधीची माहिती अद्याप देण्यात आलेली नाही. ही बाब गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहे. धारावी बचाव आंदोलनाने अखेर ही माहिती समोर आणली आहे. अदानी समुहाकडून सर्व कामात गुप्तता राखली जाते. मग ते सर्वेक्षण असो किंवा मुंबईतील जागेची मागणी असो. धारावी पुनर्विकासाचे भूमिपूजनही अदानीने असेच गुपचूप केले होते.

# ॲलोपॅथी औषधे देण्याची होमिओपॅथी डॉक्टरांना परवानगी; अन्न, औषध प्रशासनाचा निर्णय

**■ मुंबई : नितीन देवळेकर**

महाराष्ट्र वैद्याकीय परिषदेच्या नियमानुसार 'सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी' (सीसीएमपी) हा सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणारे होमिओपॅथी डॉक्टर नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिक म्हणून नोंदणीस पात्र ठरतात. या नियमानुसार होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीची औषधे विक्री करण्यास तसेच त्यांच्या चिठ्ठीवर रुग्णांना औषध विक्री करण्यास औषध विक्रेत्यांना अन्न व औषध प्रशासनाने परवानगी दिली आहे.

औषधे व सौंदर्यप्रसाधने कायदा १९४० अंतर्गत नियम १९४५ मधील नियम २ (ईई) नुसार नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिकांच्या औषध चिठ्ठी आधारेच रुग्णांना औषध विक्री करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र वैद्याकीय परिषद १९६५ अंतर्गत नमूद अनुसूचीमध्ये ती व्यक्ती या कायद्यांतर्गत नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिक म्हणून नोंदणी करण्यास पात्र ठरते. त्यामुळे सर्व औषध विक्रेते हे सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी (सीसीएमपी) पूर्ण करणाऱ्या होमिओपॅथी नोंदणीकृत डॉक्टर ॲलोपॅथी औषधांची विक्री करू शकतात. तसेच किरकोळ औषध विक्रेते हे या



डॉक्टरांद्वारे देण्यात आलेल्या औषधांच्या चिठ्ठीद्वारे रुग्णांना औषध विक्री करू शकतात. मात्र ही औषध विक्री करताना औषध चिठ्ठीवर नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिकांचा नोंदणी क्रमांक व सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी (सीसीएमपी) प्रमाणपत्राचा क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. औषध चिठ्ठीवर या बाबी नमूद असल्याची खात्री करण्याची जबाबदारी औषध विक्रेत्यावर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे राज्यामध्ये होमिओपॅथी डॉक्टर स्वतः रुग्णांना ॲलोपॅथी औषधांची विक्री करू शकतात. तसेच त्यांच्या चिठ्ठीवर ॲलोपॅथी औषधे मिळण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. राज्य शासनाने मान्यता दिलेला 'सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी' (सीसीएमपी) उत्तीर्ण केला असल्यास संबंधित वैद्याकीय व्यावसायिकांचा नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिकांमध्ये समावेश करण्यात येतो. त्यामुळे 'सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी' हा कोर्स पूर्ण करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकाला आधुनिक चिकित्सा पद्धतीची औषधे वापरून वैद्याकीय व्यवसाय करण्याची परवानगी दिली आहे.

## थकीत भाडेवसुलीसाठी 'महारेरा' प्रारुप; 'झोपु' प्राधिकरण वसुली आदेश जारी करणार

**■ मुंबई : यश सावंत**

झोपडपट्टी पुनर्वसन (झोपु) योजनांमध्ये थकीत भाडे वसुलीसाठी विकासकाच्या मालमत्तेवर टाच आणता येईल का, या दिशेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने प्रयत्न सुरू केले आहेत. थकित भाडेवसुलीसाठी थेट वसुली आदेश काढून त्याची अंमलबजावणी प्राधिकरणाकडूनच करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. याबाबत 'झोपु' कायद्यात सुधारणा करण्याचे विधेयक येत्या विधिमंडळाच्या अधिवेशनात आणले जाणार आहे. दरम्यान, वसुलीसाठी महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाकडून (महारेरा) राबविल्या जाणाऱ्या पद्धतीचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

प्राधिकरणातील भाडे थकबाकी ६०० ते ७०० कोटींच्या घरात पोहोचली, त्यावर न्यायालयाने ताशेरे ओढल्यानंतर प्राधिकरणाने परिपत्रक काढून दोन वर्षांचे आगाऊ भाडे जमा केल्याशिवाय आणि त्यानंतर पुढील वर्षभरासाठी धनादेश सादर केल्याशिवाय 'झोपु' योजनेला मंजुरी द्यायची नाही, असा निर्णय घेतला. या शिवाय आतापर्यंत थकलेल्या भाड्याची वसुली करण्यासाठी वेगवेगळे मार्ग राबविले. 'झोपु'च्या नव्या संकेतस्थळावर भाडे व्यवस्थापन प्रणाली सुरू करण्यात आली. त्यामुळे भाडे न मिळाल्यास झोपडीवासीयांना तक्रार करणे सोपे झाले. अशी तक्रार आल्यानंतर ती मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचत असल्यामुळे सहकार विभागातील अधिकारीही सक्रिय झाले व भाडेवसुलीसाठी प्रयत्न करू लागले. आतापर्यंत प्राधिकरणाने ६०० कोटी रुपयांचे भाडे वसूल करण्यात यश मिळविले आहे. आता एखादी थकीत भाड्याची तक्रार आली तरी प्राधिकरणाकडून 'झोपु' योजनेच्या लेखापरिक्षणाचे आदेश दिले जात आहेत. त्यामुळे विकासकांचे धाबे दणाणले आहेत.

स्थावर संपदा (रेरा) कायद्यातील कलम ४० (१) नुसार, महारेराकडून घरखरेदीदाराला विकासकाकडून मिळणाऱ्या नुकसानभरपाई वा व्याजापोटी वसुली आदेश जारी केले जातात. भू-महसूल कायद्यातील तरतुदीनुसार, वसुली करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी कार्यालयाचा असल्यामुळे महारेराकडून ते संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले जातात. त्यानंतर जिल्हाधिकारी तहसीलदाराची नियुक्ती करून सुरुवातीला संबंधितांना नोटीस आणि त्यानंतर लिलाव करून ही वसुली करून देतात. या पद्धतीने महारेराला गेल्या काही महिन्यांत चांगलेच यश मिळाले आहे. त्यामुळे झोपु प्राधिकरणातील भाडे थकबाकीच्या वसुलीसाठी हा मार्ग अवलंबिण्याचे ठरविण्यात आले आहे.

**विकासकांवर वचक**

- भाडे थकबाकी वसुलीसाठी प्राधिकरणाकडून संबंधित 'झोपु' योजनेला स्थगिती दिली जाते. जोपर्यंत भाडे जमा केले जात नाही तोपर्यंत स्थगिती उठविली जात नाही.
- बऱ्याचवेळा विकासकांकडून भाडे जमा करण्यास विलंब लावला जातो. अशा वेळी विकासकाच्या मालमत्तेवर टाच आणून लिलावाद्वारे वसुली करता येईल का, याची चाचपणी प्राधिकरणाने सुरू केली.
- प्राधिकरणाकडे महसूल अधिकाऱ्यांची स्वतंत्र फौज असल्यामुळे वसुली आदेश जारी करून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्याऐवजी प्राधिकरणाला स्वतः ही वसुली करणे शक्य आहे. त्यामुळे विकासकांना वचक बसेल आणि भाडे थकबाकीचा प्रश्न निकाली निघेल, असा प्राधिकरणाला विश्वास आहे.

## गतवर्षीच्या तुलनेत फ्लूच्या रुग्णांमध्ये दुपटीने वाढ: मुंबईमध्ये सर्वाधिक रुग्ण तर नागपूरमध्ये सर्वाधिक मृत्यू

**■ मुंबई : विशाल कारंडे**

**सर्वसाधारणपणे हिवाळयामध्ये मोठ्या प्रमाणात दिसणारे इन्फ्लूएंजाचे रुग्ण यंदा संपूर्ण वर्षभर सातत्याने सापडत आहेत. परिणामी गतवर्षीच्या तुलनेत फ्लूच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. तसेच मृत्यूही वाढले आहेत. यंदा राज्यात २ हजार ३४६ रुग्ण सापडले असून त्यातील ७२ जणांचा मृत्यू झाला आहे.**

वातावरणात होणाऱ्या बदलांनुसार संसर्गजन्य आजार वाढत असतात. साधारणपणे हिवाळ्यामध्ये फ्लूचे रुग्ण सापडत असतात. मात्र यंदा संपूर्ण वर्षभर राज्यात फ्लूचे रुग्ण अधूनमधून सापडत आहेत. आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात गतवर्षी फ्लूचे १२३१ रुग्ण सापडले होते. तर ३२ जणांचा मृत्यू झाला. मात्र २०२४ मध्ये त्यात दुपटीने वाढ झाली आहे. २०२४ मध्ये राज्यात फ्लूचे २ हजार ३४६ बाधित रुग्ण सापडले तर ७२ जणांचा मृत्यू झाला. राज्यात २०२४ मध्ये आतापर्यंत २३ लाख ५६ हजार ४०३ रुग्णांच्या फ्लूच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. त्यात ६ हजार ४३ संशयित रुग्ण सापडल्याने त्यांना आसेलटॅमिवीर औषध देण्यात आले आहे. या संशयित रुग्णांमधून २ हजार ३४६ बाधित रुग्ण सापडले आहेत. यामध्ये मुंबईमध्ये सर्वाधिक ७८५ रुग्ण सापडले असून, त्याखालोखाल पुणे ३६२ रुग्ण, ठाणे २८० रुग्ण, नाशिक २७४ रुग्ण, कोल्हापूर २६८रुग्ण आणि नागपूर १२२



इतके रुग्ण सापडले आहेत. राज्यात फ्लू मुळे ७२ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यात सर्वाधिक मृत्यू नागपूरमध्ये झाले असून मृतांची संख्या २६ आहे. त्याखालोखाल नाशिकमध्ये २२ रुग्ण, कोल्हापूर ७, मुंबई व सातारा प्रत्येकी ५, छत्रपती संभाजी नगर ३ आणि अहमदनगर आणि जळगावमध्ये प्रत्येकी दोन जणांचा मृत्यू झाला. सतत खोकला येणे, थंडी येणे, ताप येणे ही एच१एन१ आणि एच३एन२ ची मुख्य लक्षणे आहेत. याशिवाय काही रुग्णांना वास न येणे, सतत थकवा जाणवणे, स्नायू दुखणे, घशामध्ये सतत खवखव होणे, सतत नाक वाहणे अशी महत्त्वाची लक्षणे असतात. अशी लक्षणे दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. लहान मुले, महिला आणि वृद्ध लोक यांना अधिक धोका असतो. त्याचबरोबर हृदय किंवा फुफ्फुसचा आजार, मधुमेह अशा सहव्याधीने त्रस्त असलेले आणि लठ्ठपणा असलेल्या व्यक्तींना इन्फ्लूएंजाचा संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते.

# ‘...अन्यथा आमच्या सरकारवर ठपका पडेल’, मंत्री भरत गोगावलेंचं बीडच्या सरपंच हत्या प्रकरणावरून मोठं विधान

■ मुंबई : यश सावंत

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेप्रकरणी सर्वच क्षेत्रातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात काही आरोपींना पोलिसांनी अटक केलं आहे. मात्र, अद्यापही या प्रकरणातील काही आरोपी फरार आहेत. या फरार आरोपींवर तात्काळ अटकेची कारवाई करण्यात यावी आणि संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात विविध पक्षाचे नेते, आमदार आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी मोर्चाला संबोधित करताना विविध नेत्यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला. तसेच या प्रकरणात तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, या घटनेवर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा मंत्री भरत गोगावले यांनी देखील मोठं भाष्य केलं आहे. ‘मस्साजोगच्या सरपंच हत्या प्रकरणी कारवाई झाली पाहिजे. या घटनेत जे कोणी आरोपी असतील त्यांना कडक शासन झालंच पाहिजे, अन्यथा आमच्या सरकावर तो ठपका पडेल’, असं भरत गोगावले यांनी म्हटलं आहे. बीडमधील सरपंच हत्या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मंत्री भरत गोगावले म्हणाले, ‘बीड जिल्ह्यात जी हत्येची घटना घडली ती अंत्यत दुर्देवी आहे. ही हत्या अत्यंत निर्घृण पद्धतीने करण्यात आलेली आहे. या घटनेत जे-जे आरोपी असतील त्याला शासन व्हायला पाहिजे. आमचं महायुतीचं सरकार जर हे करू शकलं नाही तर तो ठपका आमच्यावर पडेल’, असं मंत्री



भरत गोगावले यांनी म्हटलं आहे. दरम्यान, महाविकास आघाडीच्या नेत्यानंतर आता शिवसेना शिंदे गटाचे मंत्रीही बीडच्या प्रकरणावरून आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे.

दरम्यान, मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणात वाल्मिक कराड यांचाही सहभाग असल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे. तसेच वाल्मिक कराड यांना मंत्री धनजंय मुंडे हे वाचवत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. त्यामुळे यावरून बीड जिल्ह्यात चांगलंच राजकार तापलं आहे. तसेच विरोधकांनी धनजंय मुंडे यांच्यावर आरोप करताना असंही म्हटलं आहे की, धनंजय मुंडेंच्या आशीर्वादाने वाल्मिक कराडला संरक्षण मिळतं आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराडला आरोपी करण्यात यावं आणि धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी, अशी मागणी महाविकास आघाडीकडून करण्यात आली आहे. मात्र, धनंजय मुंडेंच्या यांच्या राजीनाम्यासंदर्भातील विरोधकांच्या मागणीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री हसन मुश्रीफ यांनी देखील भाष्य केलं.

# ‘आयुष्यात काहीक्षण धुकं येतं, पण...’, सुधीर मुनगंटीवार यांचं सूचक विधान

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. त्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार आणि खातेवाटपही झालं. मात्र, महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात काही दिग्गज नेत्यांना डावलण्यात आल्याने काही नेते नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात अद्यापही सुरु आहे. मंत्रिमंडळ विस्तारानंतर महायुतीतील तीनही पक्षांमध्ये असंतोषाचा भडका उडाला होता. छगन भुजबळ, सुधीर मुनगंटीवार यांच्यासह अजून काही नेत्यांना मंत्रीपद मिळालेलं नाही. छगन भुजबळ यांनी तर आपल्याला मंत्रिपद न मिळाल्यामुळे जाहीर नाराजी बोलून दाखवली. एवढंच नाही तर छगन भुजबळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबाबत नाराजी व्यक्त केली होती. तसेच भुजबळांनी



कार्यकर्त्यांशी संवाद साधत पुढील भूमिकेबाबत संकेतही दिले होते. तसेच भाजपाचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनाही मंत्रिमंडळात संधी न मिळाल्यामुळे ते नाराज असल्याची चर्चा होती. मात्र, त्यानंतर मुनगंटीवार यांनी स्पष्टीकरण देत आपण नाराज नसल्याचं म्हटलं होतं. दरम्यान, आता सुधीर मुनगंटीवार यांनी एका कार्यक्रमात बोलताना सूचक विधान केलं आहे. ‘जीवनात काहीक्षण धुकं येत असतं, पण ते धुकं पर्मनंट नसतं’, असं सूचक वक्तव्य मुनगंटीवार यांनी केलं. त्यांच्या या विधानाचा अर्थ काय? याबाबत आता अनेकांनी तर्कवितर्क लावण्यास सुरुवात केली आहे. ‘मी मुंबईतून नागपूरसाठी सकाळी विमानात बसलो. मात्र, अचानक काय झालं की मी नागपूरला उतरू शकलो नाही आणि विमानही उतरू शकलं नाही. कारण नागपूरमध्ये एवढं धुकं जमा झालं की ते विमान नागपूरला न उतरता विमानाचा पायलट थेट हैदराबादला घेऊन गेला.

# ‘भाषण संपल्यानंतरच व्हॉट्सअ‍ॅप चॅटचा स्क्रीनशॉट कसा आला?’, जितेंद्र आव्हाड यांचा सवाल

■ मुंबई : गणेश बागडे

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. तसेच सर्वच स्थरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणातील काही आरोपींना अटक करण्यात आली. मात्र, काही आरोपी अद्यापही फरार आहेत. त्यामुळे संतोष देशमुखांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत बीडमध्ये शनिवारी मोर्चा काढला. या मोर्चात बोलताना अनेक लोकप्रतिनिधींनी वाल्मिक कराड मागचा सूत्रधार असल्याचा आरोप विरोधकांनी केला.

तसेच वाल्मिक कराडला मंत्री धनंजय मुंडे व त्यांचा पक्ष (राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार)) पाठिशी घालत असल्याचा आरोप विरोधकांनी केला. या मोर्चात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे देखील सहभागी झाले होते. पण राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या (अजित पवार पक्ष) नेत्या रुपाली ठोंबरे यांनी या मोर्चावर शंका उपस्थित केली. तसेच आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. रुपाली ठोंबरे यांनी एक्सवर (ट्विटर) एक कथित व्हॉट्सअ‍ॅप चॅटचा स्क्रीनशॉट शेअर केला आणि जितेंद्र आव्हाड हे देशमुख हत्या प्रकरणात कुटुंबाला न्याय देण्यासाठी आले होते की आग लावण्यासाठी आले होते, असं म्हणत हल्लाबोल केला. दरम्यान, यावर आता जितेंद्र आव्हाड यांनी कथित व्हॉट्सअ‍ॅप चॅटसंदर्भात काही सवाल उपस्थित केले आहेत. ‘मोर्चातील माझं भाषण संपल्यानंतर लगेच व्हॉट्सअ‍ॅप चॅट स्क्रीनशॉट बाहेर कसा आला?



मग त्याआधी सकाळी स्क्रीनशॉट का नाही आला?’, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. ‘मी शनिवारी स्वत: पोलीस ठाण्यात जाऊन यासंदर्भात तक्रार केली आहे. आता फक्त बीडच्या पोलीस अधीक्षकांना माझी विनंती आहे की त्यांनी पुढील कारवाई करावी. माझं भाषण संपल्या-संपल्याच व्हॉट्सअ‍ॅप चॅटचा स्क्रीनशॉट कसा समोर आला? मग व्हॉट्सअ‍ॅप चॅटचा स्क्रीनशॉट सकाळीच यायला हवा होता ना? मात्र, भाषण संपल्यानंतर व्हॉट्स ॲप चॅटचा स्क्रीनशॉट अचानक कसा येतो?’, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला.

‘आपल्याला कालपासून धमक्यांचे मेसेज येत असल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला आहे. आव्हाड म्हणाले, ‘मला आताही एक मेसेज आला आहे. अतिशय अर्वाच्य भाषेत मेसेज आणि मारायची धमकी व शिवीगाळ करणारा मेसेज मला आहे.

# एकसंधपणे काम करून राजकीय चित्र बदलूयात! पृथ्वीराज चव्हाणांचे कार्यकर्ता मेळाव्यात आवाहन

■ कराड : यश सावंत

कॉंग्रेसने देशात लोकशाही आणली, पण विधानसभेतील निवडणुकीनंतर लोकशाही जिवंत आहे का, असा प्रश्न सर्वांसमोर आहे. लोकसभेनंतर चार महिन्यांत विधानसभेच्या निकालाचे उलटे चित्र दिसले. यावर कोणाचाच विश्वास बसत नाही. आता येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपणही एकसंधपणे काम करून राजकीय चित्र बदलूयात, असे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण केले.

कॉंग्रेसच्या कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत होते. कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ॲड. उदयसिंह पाटील-उंडाळकर, युवक कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष शिवराज मोरे आदी उपस्थित होते. केंद्रीय सहकारमंत्री



अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी केलेल्या वक्तव्याचा मेळाव्यात निषेध करण्यात आला. चव्हाण म्हणाले, ‘लोकशाहीवर विश्वास ठेवून मिळालेला निकाल आपण स्वीकारला. राज्यातील वातावरण हे संशयाचे असल्याने निवडणूक आयोगाने जनतेच्या मनातील संशय दूर करणे आवश्यक आहे. लोकसभा निवडणुकीनंतर परिस्थिती इतकी बदलेल, असे वाटत नाही. पारदर्शक, मुक्त वातावरणात निवडणुका होत नाहीत. मतदान यंत्र (ईव्हीएम) प्रक्रियेबाबत प्रत्येकाला शंका आहे. कॉंग्रेसने पुढील निवडणुका मतदान प्रक्रियेने झाली पाहिजे, याकरिता देशव्यापी स्वाक्षरी मोहीम हाती घेतली आहे. सातारा जिल्ह्याला यशवंतराव चव्हाण यांनी विचार दिला; तो तात्पुरता विधानसभा निवडणुकीनंतर लुप्त झाला. पुढील काळ कार्यकर्त्यांच्या कसोटीचा आहे. आगामी निवडणुकांना सामोरे जाण्याचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. मी तुमच्या सोबत ठामपणे उभा आहे. चार महिन्यांत अनेक घडामोडी होतील. त्यावर मात करून आपण स्थानिक निवडणुकांना सामोरे गेल्यास निश्चित यश मिळेल,’ असा विश्वास पृथ्वीराज चव्हाण यांनी दिला.

ॲड. उदयसिंह पाटील-उंडाळकर म्हणाले, ‘छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदुत्व आम्हाला मान्य असून, हेच हिंदुत्व टिकवण्याची गरज आहे. महात्मा गांधींनाही हिंदुत्व मान्य होते. अखेरचा श्वास घेताना ते ‘हे राम’ म्हणाले होते. या निवडणुकीचे सिंहावलोकन करून पुढे जाणे गरजेचे आहे. लाडकी बहीण योजना, मोफत वीज, धार्मिक तेढ यामुळे महायुतीला यश मिळाले. ईव्हीएमबाबत सर्वत्र शंकेचे वातावरण आहे. या परिस्थितीत संघर्ष करण्याशिवाय पर्याय नाही. सामान्य माणसापर्यंत पोचले पाहिजे. नेता आणि कार्यकर्ता बरोबर चालला, तर संघटनेला उभारी देऊ शकतो.’

# ‘...तोपर्यंत राजीनामा देण्याची आवश्यकता नाही’, मंत्री हसन मुश्रीफ यांचं धनंजय मुंडेंबाबत विधान

■ मुंबई : नितीन देवळेकर

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या केल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. या घटनेनंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. यावर सर्वच क्षेत्रातून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत. या घटनेला आज २१ दिवस केलं आहे. जोपर्यंत कोणी दोषी आढळत नाही तोपर्यंत राजीनाम्याची आवश्यकता नसल्याचं हसन मुश्रीफ यांनी म्हटलं आहे.

‘आमदार सुरेश धस यांनी जे आरोप केले आहेत. त्या आरोपावर धनंजय मुंडे यांनी उत्तर दिलेलं आहे. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणात





झाले आहेत. मात्र, अद्याप या प्रकरणातील काही आरोपी फरार आहेत, तर काही आरोपींना पोलिसांनी अटक केलं आहे. त्यामुळे फरार आरोपींना अटक करण्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चा देखील काढण्यात आला. तसेच फरार आरोपींना अटक करण्याची मागणी करण्यात आली. तसेच या घटनेत वाल्मिक कराड यांचाही सहभाग असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. तर मंत्री धनजंय मुंडे यांच्यावरही विरोधकांकडून टीका करण्यात येत असून त्यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा घेण्याची मागणी विरोधी पक्षाकडून होतं आहे. दरम्यान, विरोधकांच्या मागणीवर बोलताना हसन मुश्रीफ यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासंदर्भात भाष्य जे आरोपी असतील त्याला तुम्ही शिक्षा द्या, अशी स्पष्ट भूमिका धनंजय मुंडे यांनी मांडलेली आहे’, असं हसन मुश्रीफ यांनी म्हटलं. भाजपा टार्गेट करतंय असं वाटतं का? या प्रश्नांवर बोलताना हसन मुश्रीफ म्हणाले, ‘अशातला काही प्रश्न नाही. जे योग्य असेल त्याची चौकशी व्हायला काहीही हरकत नाही. देवेंद्र फडणवीस हे अतिशय कार्यक्षम मुख्यमंत्री आहेत. गृहखातंही त्यांच्याकडे आहे, त्यामुळे ते या घटनेत कारवाई करतील.’

संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून विरोधक चांगलेच आक्रमक झाले आहेत. वाल्मिक कराड यांचाही या प्रकरणात सहभाग असल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे, तर वाल्मिक कराड यांना मंत्री धनजंय मुंडे हे वाचवत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

# फेब्रुवारीपासून जेएनपीए ते गेट वे अवघ्या २५ मिनिटांत; उरणकरांसाठी जलद प्रवास सुविधा

■ उरण : सतिश सोनावणे

जेएनपीए बंदर ते मुंबईतील गेट वे ऑफ इंडियादरम्यान सुरू असलेला जलप्रवास फेब्रुवारीपासून जलद होणार आहे. सध्याचा तासाभराचा असलेला हा प्रवास अवघ्या २५ मिनिटांत वातानुकूलित ई स्पीड बोटमधून करता येणार आहे. त्यामुळे उरणकरांना गारेगार प्रवास सुविधा उपलब्ध होणारआहे.

या जलद प्रवासासाठी जादाचे दर आकारले जाणार आहेत. जेएनपीए बंदर ते गेट वे ऑफ या मार्गावरील लाकडी प्रवासी बोटींना सरत्या वर्षात अलविदा करण्याचा निर्णय जेएनपीए संचालक मंडळाने घेतला आहे.नवीन वर्षापासून बंदरातून मुंबईत प्रवाशांना घेऊन जाण्या-येण्यासाठी अद्यायावत स्पीड बोटी धावणार आहेत. या प्रदूषणविरहित स्पीडबोटीमुळे २५ मिनिटांत प्रवाशांना जेएनपीएहून मुंबईत पोहचता येणार आहे. याचा फायदा या सागरी मार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्वांनाच होणार आहे. या सागरी मार्गाने जेएनपीएचे कामगार, नातेवाईक, स्थानिक प्रकल्पग्रस्त, कस्टम, एअरफोर्स,



सीआयएसएफ, पोर्ट युजर्स आदी कामगारांसाठी वापर करता येत आहे.सकाळी सात वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत या मार्गावरून बोटी सुरू असतात. जेएनपीए प्रशासनाने लाकडी प्रवासी बोटी बंद करण्याचा निर्णय घेऊन त्याजागी प्रदूषणविरहित इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान व सोयीसुविधांनी सुसज्ज असलेल्या स्पीडबोटींचा पर्याय स्वीकारला आहे. प्रदूषणविरहीत, सुरक्षित आणि कमी वेळेत मुंबईत ये-जा करण्यासाठी स्पीडबोटींचा पर्याय स्वीकारण्याची संकल्पना जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी अमलात आणण्यासाठी सूचना केली होती. त्याची अंमलबजावणी सुरू करण्यासाठी जय्यत तयारी सुरू केली असल्याची माहिती जेएनपीएचे उपसंरक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांनी दिली. जेएनपीएने १० वर्षाच्या कालावधीसाठी दोन स्पीड बोटींच्या ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० खर्चाच्या निधीलाही २० डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली असल्याची माहिती जेएनपीएचे विश्वस्त रवींद्र पाटील यांनी दिली.

# नववर्षाच्या पूर्वसंध्येला कल्याण, डोंबिवलीत १७० तळीरामांवर कारवाई

■ कल्याण : आकाश कांबळे

नववर्षाचा आनंद साजरा करत असताना कल्याण, डोंबिवली शहरांच्या विविध भागात मोकळ्या जागांवर मद्य, अंमली पदार्थ सेवन करणारे, ढाब्यामध्ये मद्य विक्रीची



परवानगी नसताना मद्य विक्री करून ग्राहकांची गर्दी जमवणे, सार्वजनिक रस्त्यांवर झाडांचा आडोसा घेऊन मद्य सेवनासाठी रात्री उशिरापर्यंत बसणे, अशा सुमारे १७० तळीरामांवर पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या आदेशावरून स्थानिक पोलिसांनी शनिवारी रात्री कारवाई केली आहे.

नवर्षाचा आनंद कायदा आणि सुव्यवस्थेचे उल्लंघन होणार नाही, शांततेत घेण्याचे आवाहन पोलिसांनी करूनही कल्याण, डोंबिवली शहरातील अनेक युवा, ज्येष्ठ मद्य सेवन करून सार्वजनिक रस्त्यावर धिंगाणा घालत असल्याचे गस्तीवरील पथकांना आढळले. काही ठिकाणी चाळी, इमारतींचा आडोसा घेऊन गांजा सदृश्य अंमली पदार्थ सेवन करत असल्याचे आढळले. अनेक जण डोंबिवलीतील ठाकुर्ली ९० फुटी रस्ता, कल्याण पूर्वेतील १०० फुटी रस्ता भागात उघड्यावर मद्य सेवन करत असताना पोलिसांनी पकडले. शनिवारी रात्रभर पोलिसांनी कल्याण, डोंबिवली शहराच्या विविध भागात ही धरपकड मोहीम राबवली. कल्याणमध्ये एका चहा विक्रीचा नामफलक असलेल्या दुकानाला पडदे लावून तेथे मद्य विक्री सुरू असल्याचे पोलिसांच्या कारवाईत उघड झाले. मागील काही महिन्यांपासून कल्याण, डोंबिवली शहरांमध्ये वाढते लैंगिक अत्याचार, हल्ले, मारहाणीच्या घटना घडत आहेत. या घटनांच्या मुळाशी मद्यधुंद स्थिती, अंमली पदार्थ सेवन या गोष्टी कारणीभूत असल्याचे पोलीस तपासात पुढे येत आहे. या मुळावर घाव घालण्यासाठी पोलिसांनी ही धरपकड मोहीम सुरू केली आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत करताना अनेकांकडून सार्वजनिक ठिकाणी नियमबाह्य कृती घडण्याची शक्यता आहे.

# ‘चला व्यसन बदनाम करूया’ अभियान! महाराष्ट्र अंनिस आणि परिवर्तन व्यसनमुक्ती केंद्राचा उपक्रम

■ सातारा : राकेश गायकवाड

अनेक तरुण-तरुणी ३१ डिसेंबरला व्यसनाचा पहिला अनुभव घेतात आणि पुढे जाऊन व्यसनाच्या आहारी जातात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंनिस आणि परिवर्तन व्यसनमुक्ती संस्था यांच्या मार्फत ‘चला व्यसन बदनाम करूया’ मोहिमेचे आयोजन केले आहे. ‘दारू नको दूध प्या!’ हा उपक्रम सर्वत्र राबवला जाणार आहे, अशी माहिती डॉ. हमीद दाभोलकर आणि प्रशांत पोतदार यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली आहे. मागील पंधरा वर्षापासून महाराष्ट्र अंनिस आणि परिवर्तन व्यसन मुक्ती संस्था डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ‘चला व्यसन बदनाम करूया’ ही मोहीम राबवते. सध्या समाजात व्यसनाचे उदात्तीकरण होताना दिसते आहे. यामुळे तरुण मुले व्यसनाच्या आहारी जाण्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे. महाराष्ट्र शासन मात्र महसूल वाढवण्यासाठी समाजात व्यसन वाढवण्याला प्रोत्साहन देताना दिसते. मद्यविक्री वाढवून शासनाचा महसूल वाढवण्याचे शासनाने नुकतेच सूतोवाच केले आहे. एका बाजूला लाडक्या बहिणीला पैसे द्यायचे आणि भावाला मात्र व्यसनाच्या तोंडी द्यायचे असे हे धोरण आहे. त्यामुळे याला आमचा विरोध आहे. त्यामुळेच व्यसनाची प्रतिष्ठा तोडण्याबरोबरच शासनाने समग्र व्यसन विरोधी नीती जाहीर करावी यासाठी देखील या साप्ताहादरम्यान पाठपुरावा केला जाणार असल्याचे या पत्रकात म्हटले आहे. या साप्ताहाअंतर्गत राज्यभरात व्यसनविरोधी युवा निर्धार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे.



व्यसनमुक्त व्यक्तीच्या हस्ते दारूच्या बाटलीला जोडे मारून मेळाव्याचे उद्घाटन केले जाणार आहे. या मेळाव्यामध्ये तरुणांना व्यसनमुक्ती दूत म्हणून काम करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. व्यसनमुक्ती दूताचे प्रशिक्षण घेतलेले युवक युवती पुढील आठवड्यामध्ये समाजात व्यसनाच्या विरोधी पोस्टर प्रदर्शन, व्यसनविरोधी फिल्म शाळा कॉलेजमध्ये दाखवणे, गावामध्ये व्यसनविरोधी फेरीचे आयोजन करणे, शाळा कॉलेजमध्ये व्यसनाविषयी भाषण देणे, दारूच्या बाटलीला जोडे मारा आंदोलन, व्यसनविरोधी प्रतिज्ञा असलेल्या फ्लेक्सवर नागरिकांच्या सह्या घेणे तसेच समाज माध्यमातून व्यसन विरोधी संदेश प्रसारित करणे, असे कार्यक्रम ठिकठिकाणी करणार आहेत, अशी देखील माहिती देण्यात आली. ३१ डिसेंबरला लोकांनी दारू प्यावी म्हणून दारू दुकाने उशिरापर्यंत चालू ठेवण्याची परवानगी शासन देते हे व्यसनाला प्रोत्साहन देणारे धोरण शासनाने थांबवावे म्हणून जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांना ठिकठिकाणी निवेदन देण्यात येणार असल्याचेदेखील पत्रकात नमूद केलेले आहे. ३१ डिसेंबरला ‘दारू नको दूध प्या’ या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामध्ये नागरिकांना दारूचे दुष्परिणाम सांगून दारू ऐवजी शरीराला हितकारक दूध पिण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई: पुण्यात 31 लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

पुणे विभागाच्या राज्य उत्पादन शुल्क विभाग भरारी पथकाच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाईत अहिल्यानगर जिल्हयात जामखेड तालुक्यातील अरणगाव तसेच धाराशिव जिल्हयात परांडा तालुक्यातील लोणारवाडी येथे ३१ लाख २३ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे विभागीय उपायुक्त सागर थोमकर यांनी दिली आहे. विभागीय भरारी पथकाच्या वतीने अहिल्यानगर जिल्हयातील जामखेड तालुक्यामधील अरणगाव गावाच्या हद्दीत श्रीगोंदा जामखेड मार्गावरील एच. पी. पेट्रोल पंपाजवळ महिंद्रा कंपनीची स्कॉर्पीओ चारचाकी वाहनामधील गोवा बनावटीचे मद्य मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर वाहनामध्ये भरत असताना छापा मारुन गोवा बनावटीच्या ॲडीरियल व्हिस्कीच्या ७५० मिली क्षमतेच्या एकूण ३२४ सिलबंद बाटल्यांचे २७ बॉक्स, दोन वाहनासह अंदाजे रक्कम १६ लाख ७२ हजार ७२० रुपये किंमतीचा



मुद्देमाल जप्त करुन संबंधिताविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गुन्हयाच्या अनुषंगाने पुढील तपासामध्ये धाराशिव जिल्हयातील परांडा तालुक्यात लोणारवाडी परिसरात भैरवनाथ मंदिराजवळ अशोक लिलॅण्ड कंपनीचा चारचाकी वाहन व मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर या वाहनाससह ॲडरीयल व्हिस्कीच्या ७५० मिली क्षमतेच्या २१६ सिलबंद बाटल्यांचे १८ बॉक्स असा अंदाजे रक्कम १४ लाख ५० हजार ४८० रुपये किंमतीचा मुद्देमाल रिकव्हरी पंचनाम्याखाली जप्त करुन दोन व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणी अहिल्यानगर जिल्हयातील दीपक आत्माराम खेडकर, भरत शहाजी राळेभात, मनोज दत्तात्रय रायपल्ली, दत्तात्रय गंगाधर सोनवणे, धाराशिव जिल्हयातील शस्त्रगुण ऊर्फ शतृन नवनाथ किर्दक व कैलास आण्णा जोगदंड यांच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ च्या कलमाअंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरू आहे. ही कारवाई निरीक्षक नरेंद्र थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक विराज माने व धीरज सस्ते, प्रताप कदम, सतिश पौधे, शशिकांत भाट, रणजीत चव्हाण, अनिल थोरात, अमोल दळवी, राहुल तारळकर यांनी केली. अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यावर अशाच प्रकारची कारवाई सुरू राहणार असून, कोठेही अवैध दारू व्यवसाय सुरू असल्यास राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२०-२९९११९८६ वर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आले आहे.

# कराडमधील कुंटणखाना,१० कॅफेवर पोलीसांचा छापा; महिलेसह चौघांवर गुन्हा दाखल

**कराड : विशेष प्रतिनिधी**

लॉजवरील कुंटणखाना आणि कराड उपनगरातील कॅफे हाऊस सध्या पोलिसांच्या रडारवर आहेत. कराड व मलकापूर परिसरातील १० कॅफेवर पोलीस उपअधीक्षक अमोल ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखालील चार पथकांनी केलेल्या कारवाईत अनेक जोडपी पोलिसांच्या कारवाईत अडकली. तर, लॉजवरील कुंटणखान्यातून दोन महिलांची सुटका करण्यात आली. पोलिसांच्या दहा कॅफेवरील दोन तासांच्या कारवाईने खळबळ उडाली. वारंवार सूचना देऊनही प्रेमीयुगुलांना कॅफेत आडोशाची जागा करून ठेवणाऱ्या कॅफे चालक व मालकांवरही गुन्हे दाखल होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. कराड, मलकापूर परिसरात अनेक ठिकाणी आडोशाला, तर सेवा रस्त्यालगत कॅफेची संख्या वाढली असून, त्यामध्ये प्रेमीयुगुल तासन् तास अश्लिल चाळे करत बसलेली असतात. यातून गुन्हा घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. वास्तविक यापूर्वी यातून असे काही गंभीर गुन्हे घडले आहेत. यासंदर्भात पोलीस उपअधीक्षक अमोल ठाकूर यांनी साध्या वेशातील पोलिसांमार्फत खात्री करून एकाचवेळी चार पथकांकडून कारवाई करण्याची व्यूहरचना आखली आणि छापेमारी केली. दरम्यान, ओगलेवाडी (ता. कराड) येथील सम्राट लॉजवरील कुंटणखान्यावर शुक्रवारी सायंकाळी पोलिसांनी कारवाई करून दोन महिलांची सुटका केली. या लॉजवर दोन महिलांना आणून वेश्या व्यवसाय सुरू होता. याप्रकरणी कुंटणखाना चालवणाऱ्या एका महिलेसह चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये कुंटनखाना चालवणाऱ्या



एका महिलेसह, लॉजचा मालक साईराज पाटील, व्यवस्थापक विशाल विलास अवधूत, रुमबॉय मुसा मुबारक जामादार, महिला एजंट शहनाज इक्बाज मुलाणी यांचा समावेश आहे. सम्राट लॉजवर कुंटणखाना सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर तोतया ग्राहक पाठवून पोलिसांनी माहितीची खात्री करून घेतली. आणि पोलीस उपाधीक्षक ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक राजेश माळी, शीतल माने, फौजदार अशोक वाडकर आदींच्या पथकांनी पाळत ठेवून या लॉजवर छापा टाकला. आणि दोन महिलांची सुटका केली. पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या सुचनेनुसार पोलिसांनी ही कारवाई केल्याचे उपाधीक्षक अमोल ठाकूर यांनी सांगितले. ह कामगिरी सहायक पोलिस निरीक्षक राजेश माळी, शितल माने, फौजदार अशोक वाडकर, हवालदार महेश शिंदे, प्रवीण पवार, सागर बर्गे, दिपक कोळी, मयुर देशमुख यांच्या पथकाने केली

# वेदनाशामक औषधांचा नशेसाठी वापर; विक्री करणाऱ्या महिलेला अटक, १६० बाटल्या जप्त

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

नशेसाठी वापरली जाणारी औषधे बेकायदेशीररीत्या विक्री करणाऱ्या एका महिलेला हडपसर पोलिसांनी अटक केली. महिलेकडून १ लाख रुपये किंमतीच्या मेफेटरमाईन सल्फेट औषधाच्या (टर्मिन) तब्बल १६० बाटल्या जप्त केल्या आहेत. अंबिका उर्फ नेहा आनंदसिंह ठाकूर (वय२६, रा. माळवाडी, हडपसर) असे अटक केलेल्या महिलेचे नाव आहे. महिलेवर हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी स्थानिक पोलीस हद्दीत गस्त घालत आहेत. यादरम्यान, हडपसर पोलिसांचे पथक गुरुवारी (दि.२६) हद्दीत गस्त घालत होते. त्यावेळी या भागात राहणारी महिला बेकायदेशीररित्या नशेच्या औषधाची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सहायक निरीक्षक अर्जुन कुदळे, उपनिरीक्षक महेश कवळे यांच्या



पथकाने महिलेला ताब्यात घेतले. तिच्याकडून मेफेटरमाईन सल्फेट औषधाच्या १६० बाटल्या जप्त केल्या. आरोपी अंबिका ऊर्फ नेहा ठाकुर हिच्याकडे कोणताही औषध विक्री परवाना नाही. तसेच, सदरचे औषध विक्री करण्याचे कोणतेही शिक्षण घेतले नसताना, सदर औषधमध्ये केमिकल असून, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वापरल्यास त्यातील विषारी द्रव्यांचे दुष्परिणाम होऊन औषध घेणाऱ्या व्यक्तीच्या आरोग्यास गंभीर इजा होऊ शकते हे माहित असताना सुद्धा अनाधिकाराने बेकायदेशीररित्या विक्रीकरिता मिळून आली. त्यानुसार हडपसर पोलिसांनी महिलेवर गुन्हा दाखल करून तिला अटक केली आहे. ही कारवाई परिमंडळ पाचचे उपायुक्त राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक अर्जुन कुदळे, उपनिरीक्षक महेश कवळे व गायत्री पवार यांच्या पथकाने केली आहे. संबंधित महिला यापूर्वी नशामुक्ती केंद्रात राहून आलेली आहे. त्यानंतर तिने अशाप्रकारे औषध विक्री सुरू केली. औषधाची बाटली चारशे ते पाचशे रुपयांना विकत असल्याचे तपासात समोर आले आहे. तिने हे औषध कोठून आणले, याबाबत हडपसर पोलीस तपास करत आहेत. यापूर्वी देखील या औषधाच्या अवैध विक्रीचे रॅकेट पोलिसांनी उघड केले आहे. त्यामुळे शहरात असे विक्रेते सक्रिय असल्याचा अंदाज आहे.

# तिसरी मुलगीच झाली म्हणून पतीनं पत्नीला जिवंत जाळलं; पेटलेल्या शरीरानं ती पळत राहिली पण...

**बीड : विशेष प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या परभणी जिल्हयात एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. पत्नीला तिसरी मुलगीच झाल्यानंतर संतापलेल्या पतीनं आपल्या पत्नीच्या अंगावर पेट्रोल टाकून तिला पेटवून दिलं. मराठवाड्यातील बीड आरोपी कुंडलिक उत्तम काळे (३२) हा तिसरी मुलगी झाल्यामुळं पत्नी मैनाशी सतत भांडत करत असे. आरोपीकडून पत्नीला सतत शिवीगाळ केली जात होती. तीनही मुलीच कशा जन्माला आल्या, मला मुलगाच पाहीजे, या मुलींना तू तर मार नाहीतर मी मारतो, असा



आणि इतर जिल्हयात पूर्वी स्त्री भ्रूणहत्या होत होत्या. मुलाच्या हव्यासापोटी महिला आणि मुलींवरील अत्याचाराच्या अनेक घटना यापूर्वी मराठवाड्यात आणि उर्वरित महाराष्ट्रात घडलेल्या आहेत. मात्र आता काळ बदलला असल्याची जाणीव असूनही परभणीत घडलेली घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहे. या धक्कादायक घटनेचं सीसीटीव्ही फुटेजही समोर आलं आहे. परभणी जिल्हयातील गंगाखेड नाका परीसरात ही घटना घडली. धोशा पतीकडून लावला जात असल्याची माहिती मृत मैना यांच्या बहिणीनं दिली आहे. तिसऱ्या मुलीच्या जन्मानंतर आरोपी कुंडलिककडून पत्नीला अनेकदा मारहाण झाली आहे. तसेच मोठ्या दोन मुलीलाही त्यानं अनेकदा मारहाण केली, असेही मैना यांच्या बहिणीनं सांगितलं. सदर घटना गुरुवारी (दि. २६ डिसेंबर) घडली. मैना यांच्या बहिणीने सविस्तर घटनाक्रम सांगताना म्हटले की, त्यादिवशी माझी बहीण नातेवाईकांना भेटायला रुग्णालयात गेली होती.

# घराला आग लावून पती पत्नीला जिवंत जाळण्याचा प्रयत्न



**ठाणे : विशेष प्रतिनिधी**

भिवंडी येथील निजामपूरा भागात शनिवारी पहाटे घराला आग लावून पती-पत्नीला जीवंत जाळण्याचा प्रयत्न झाला. या घटनेत महिला जखमी झाली असून तिच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहे. निजामपूरा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निजामपूरा येथील कसाईवाडा परिसरात फरिन आणि आसिफ कुरेशी हे राहतात. शनिवारी दोघेही घरामध्ये झोपले असताना पहाटे ३ वाजताच्या सुमारास अचानक त्यांच्या घरावर ज्वलनशील पदार्थाने आग लावण्यात आली. ही आग घरामध्ये पसरू लागली. तसेच धूर निर्माण झाला.

दोघांनाही जाग आल्यानंतर त्यांनी आरडा-ओरड करण्यास सुरूवात केली. तसेच आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. यात फरिन यांच्या हाताच्या पंजाला भाजले. आरडा-ओरड ऐकल्यानंतर शेजाऱ्यांनी मदतीसाठी धाव घेतली. घराचा दुसरा दरवाजा उघडून त्यांनी दोघांना घराबाहेर काढले. फरिन यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन निजामपूरा पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. निजामपूरा पोलीस ठाण्यात जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. रात्री उशीरा पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले होते.

# एसटी बसमध्ये प्रवासात अश्लील चित्रफीत दाखवून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**सोलापूर : विशेष प्रतिनिधी**

एसटी बसमधून प्रवास करताना एका तरुणाने अल्पवयीन मुलीला अश्लील चित्रफीत दाखवून तिच्याशी अश्लील चाळे केल्याचा धक्कादायक प्रकार बार्शीजवळ घडला. पीडित मुलीच्या तक्रारीवरून एसटी बस थेट पोलीस ठाण्यात नेऊन त्या तरुणाला पोलिसांच्या हवाली करण्यात आले. त्याच्याविरुद्ध बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आली आहे. पीडित मुलीच्या फिर्यादीनुसार रमेश सुबराव बनसोडे (रा. धाराशिव) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. बारामतीहून बार्शीकडे येणाऱ्या एसटी बसमध्ये हा प्रकार घडला. पीडित अल्पवयीन मुलगी आपल्या आई-वडिलांसह आपल्या गावी जाण्यासाठी





बारामती बार्शी एसटी बसमधून प्रवास करीत होती. इंदापूर-टेंभुर्णीमार्गे ही बस बार्शीच्या दिशेने येत असताना पीडित अल्पवयीन मुलीच्या आसनाजवळ बसून विकृत मनोवृत्तीचा तरुण तिच्याशी गोड बोलत, आपल्या स्मार्टफोनवरून अश्लील चित्रफीत दाखवत होता आणि आक्षेपार्ह वर्तन करीत असल्याचे पाहून पीडित मुलीने आई-वडिलांचे लक्ष वेधले. तेव्हा घडलेला प्रकार पाहून संतापलेल्या आई-वडिलांसह अन्य सहप्रवाशांनी एसटी बस चालक आणि वाहकाला बस थेट पोलीस ठाण्यात घेण्यास सांगितले. त्यानुसार बार्शी शहर पोलीस ठाण्यात बस गेल्यानंतर पोलिसांना घडलेली घटना कथन करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी लगेचच संशयित म्हणून रमेश बनसोडे यास ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल केला आहे.

# पुण्यात घरफोडी करणाऱ्या अल्पवयीन आरोपींना पोलीसांकडून अटक

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

शेजारील व्यक्ती रुग्णालयात उपचारासाठी दाखल असल्याची संधी साधून दोन अल्पवयीन मुलांनी बंद घरफोडून दागिन्यांसह ९० हजारांचा ऐवज चोरणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना सहकारनगर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. तळजाई वसाहत भागात घरफोडीची घटना घडली होती. या प्रकरणी पोलिसांनी १७ वर्षीय दोन मुलांना पकडण्यात आले आहे. त्यांनी गुन्हा केल्याची कबूली दिली. त्यांच्याकडून सोन्याच्या दागिन्यांसह ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई परिमंडळ दोनच्या उपायुक्त स्मार्तना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक छगन कापसे, सहाय्यक निरीक्षक सागर पाटील व त्यांच्या पथकाने केली आहे. पंधरा दिवसांपुर्वी (दि. ९ डिसेंबर)



रोजी तळजाई वसाहत भागात घरफोडीची घटना घडली होती. संबंधित व्यक्ती आजारी होता. त्यामुळे तो रुग्णालयात ॲडमिट होता. ही माहिती या मुलांना माहिती होती. ही संधी साधत अज्ञातांनी कुलूप उचकटून आत प्रवेश केला. तसेच, घरातील कपाटातून सोन्या – चांदीचे दागिने चोरून नेले होते. सहकारनगर पोलीस आरोपींचा शोध घेत होते. तळजाई परिसर तसेच इतर भागातील तांत्रिक तपास केला. या दरम्यान गुन्ह्यातील संशयीत हे तळजाई भागातील बदाम चौकात असल्याची माहिती पोलीस अंमलदार महेश मंडलीक यांना मिळाली. त्यानूसार वरिष्ठ निरीक्षक छगन कापसे यांच्या सूचनेप्रमाणे पथकाने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले.

# बेवारस मृतदेह

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र.८६/२०२४ कलम- १९४ भा.ना. सु.संहिता २०२३ अन्वये बेवारस पुरुष अंदाजे- ६० वर्षे, बांधा- सडपातळ, रंग- सावळा, उंची- अंदाजे ५ फूट, केस काळे पांढरे असलेला इसम अंधेरी पोलीस ठाणे हद्दीत बेशुद्धावस्थेत मिळून आला असून



उपचाराकामी सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचारादरम्यान मयत घोषीत केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क -**

**श्री.भागवत बडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक**
**अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ९३७२१८३६६०**
**पोलीस ठाणे क्रमांक : ०२२-२६८३१५६२**

# चिराबाजारमधील व्यापाऱ्याचा अपघात निघाला हत्येचा कट; गुन्हे शाखेमुळे हत्येचा कट उलगडला

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

चिराबाझार येथील व्यापाऱ्याला अपघातात ठार मारण्याचा कट गुन्हे शाखेने शनिवारी उघडकीस आणला. याप्रकरणी लोकमान्य टिळक(एल.टी.) मार्ग पोलीस ठाण्यात केवळ अपघाताची




नोंद करण्यात आली होती. पण आता याप्रकरणी हत्येच्या प्रयत्नाचे कलम पोलिसांनी वाढवले आहे. आरोपींनी नुकतेच तक्रारदार व्यापाऱ्याच्या दुकानात शस्त्र ठेऊन त्याला अडकवण्याचा प्रयत्न केला होता. पण गुन्हे शाख कक्ष-९ च्या पथकाने हा कट उथळून लावत दोघांना अटक केली होती. चिराबाजार येथील व्यापारी किरणराज शाह (६७) यांच्या दुकानात पिस्तूल ठेऊन त्याला खोट्या गुन्ह्यांत अडकवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हे शाखेच्या कक्ष-९ च्या पोलिसांनी नुकतीच निरंजन गुप्ता (३५) व त्याचा साथीदार केतन पारेख (४०) यांना अटक केली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायक यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या कक्ष-९ च्या पोलिसांनी आणखी सखोल तपास केला. त्यावेळी आरोपींनी तिसऱ्या साथीदाराच्या मदतीने शाह यांना यापूर्वीही मारण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले. यावर्षी ११ नोव्हेंबरला आरोपींनी शाह यांचा अपघात झाला होता. त्याप्रकरणी एल.टी. मार्ग पोलिसांनी अपघाचा गुन्हा दाखल केला होता. पण आता तपासात व्यापाऱ्याचा अपघात घडवून त्याला मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर एल.टी. मार्ग पोलिसांनी याप्रकरणी हत्येच्या प्रयत्नाचे कलम वाढवले आहे.

# डिजिटल अटक करून फसवणूकी प्रकरणी चौघांना सूरतवरून अटक

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

आर्थिक गुन्हा दाखल झाल्याची भीती दाखवून मालाडमधील ६८ वर्षीय वयोवृद्धाला डिजिटल अटक करण्यात आल्याचे दाखवून त्याची लाखो रुपयांची सायबर फसवणूक करणाऱ्या टोळीला अटक करण्यात मालाड पोलिसांना यश आले आहे. जय रसीकभाई मोराडीया(२१), धरम मुलुभाई गोहिल(२६), संदीप प्रतापभाई केवडीया(३०) व जय जितेंद्रभाई असोद्रिया(२२) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे असून ते आंतरराज्यीय टोळीशी संबंधीत असल्याचे पोलिसांनी सांगतले.

६८ वर्षाचे वयोवृद्ध तक्रादार मालाडमध्ये राहतात. २१ डिसेंबरला सकाळी त्यांना एका अज्ञात व्यक्तीने दूरध्वनी करुन तो पोलीस असल्याचे सांगितले. तक्रारदारांसह त्यांच्या कुटुंबियांची माहिती काढून त्याने त्यांच्या आधारकार्डवरुन गोयल नावाच्या एका व्यक्तीने बॅंकेत एक खाते उघडले आहे.




या बॅंक खात्यात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे सांगून त्यांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात यावे लागेल असेही त्यांनी सांगितले. यावेळी तक्रारदारांनी ते गोयल नावाच्या कुठल्याही व्यक्तीला ओळखत नसून त्यांचा संबंधित आर्थिक गैरव्यवहाराच्या गुन्ह्यांशी काहीही संबंध नसल्याचे सांगितले. त्यानंतर या व्यक्तीने त्यांना व्हिडीओ कॉल केला होता. यावेळी त्यांना समोर एक पोलीसांच्या गणवेशात एक व्यक्ती त्यांच्याशी बोलत असल्याचे दिसून आले. त्यांना डिजीटल अटक केल्याचे सांगून त्यांना कोणाशी संपर्क साधता येणार नाही असे त्यांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणातून सुटका करण्यासाठी त्याने त्यांच्याकडे दहा लाखांची मागणी केली. नाहीतर त्यांच्यावर त्यांच्या घरात येऊन अटकेची कारवाई करावी लागेल अशी धमकी दिली होती. या प्रकाराने ते प्रचंड घाबरले आणि त्यांनी त्यांच्याकडे दहा लाख रुपये नसून साडेआठ लाख रुपयेच असल्याचे सांगितले. यावेळी त्याने त्यांना ही रक्कम हस्तांतरीत करण्यास सांगून एका बॅंक खात्याची माहिती दिली होती.

## आई-वडिलांनी इंजिनिअर बनवलं, मुलगा रिक्षाचालक झाला; तृतीयपंथी जोडीदाराशी लग्न करण्याचा निर्णय घेतल्यावर पालकांनी...

■ आंध्रप्रदेश : वृत्तसंस्था

आंध्रप्रदेशच्या एका मध्यमवयीन दाम्पत्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. नंद्याल शहरात राहणाऱ्या या



दाम्पत्याच्या २४ वर्षीय मुलानं तृतीयपंथी व्यक्तीशी लग्न करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांना धक्का बसला होता. यानंतर त्यांनी स्वतःचे जीवन संपविले. नंद्यालचे उपविभागीय पोलीस अधिकारी पी. श्रीनिवास यांनी सांगितलं की, ४५ वर्षीय सुब्बा रायडू आणि त्यांची पत्नी सरस्वती यांनी आत्महत्या केली. अनेक महिन्यांपासून दाम्पत्याचा त्यांच्या मुलाशी वाद सुरू होता. त्यांचा मुलगा सुनील कुमार तीन वर्षापासून स्थानिक तृतीयपंथी समुदायाशी जोडला गेला होता. सुनील कुमारनं एखाद्या मुलीशी लग्न करावं, अशी त्याच्या पालकांची इच्छा होती. मात्र सुनीलनं यासाठी नकार दिला. तो गेल्या काही काळापासून तृतीयपंथी जोडीदाराबरोबर राहत होता. यावरून सुनीलचं आई-वडिलांबरोबर नेहमी भांडत होत असे. पोलिसांनी दिलेल्या बातमीनुसार, सुनीलनं पालकांशी होणाऱ्या वादाला कंटाळून काही काळापूर्वी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. तपासात असेही निष्पन्न झाले की, सुनील कुमारनं तृतीयपंथी समाजातील एका व्यक्तीचे दीड लाख रुपये खर्च केले होते. हे पैसे परत मिळावेत म्हणून काही तृतीयपंथीयांनी सुनीलच्या पालकांचा जाहीर अपमान केला होता.

## राज्यात महापालिका स्तरावर प्रादेशिक परिवहन कार्यालय; परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

■ भाईंदर : सचिन कदम

राज्याच्या परिवहन कार्यालयावरील कामाचा ताण कमी करण्यासाठी जिल्ह्याऐवजी महापालिका स्तरावर स्वतंत्र प्रादेशिक परिवहन केंद्र उभारले जाणार आहे. राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी ही घोषणा केली.

राज्यात जवळपास ५७ प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि ८ उपप्रादेशिक परिवहन कार्यालये आहेत. या कार्यालयात शिकाऊ तसेच कायमस्वरूपी अनुज्ञप्ती (लायसन्स) आणि परवाना (परमिट) काढणे, त्यांचे नूतनीकरण करणे यासह वाहनांशी संबंधित विविध प्रकारची कामे केली जातात. राज्यात जिल्हा स्तरावर प्रादेशिक परिवहन केंद्र कार्यरत आहेत. काही ठिकाणी उपप्रादेशिक परिवहन केंद्रे उभारण्यात आली आहेत. मात्र कामाचा आवाका प्रचंड असतो. महानगरपालिका क्षेत्रात काम सर्वाधिक कामे असल्यामुळे त्याचा ताण परिवहन विभागाच्या कामकाजावर होत असतो. यावर तोडगा काढण्यासाठी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी परिवहन आयुक्त विवेक भीमनवर आणि परिवहन अधिकाऱ्यांची बैठक आयोजिक केली होती. या बैठकीत



प्रादेशिक परिवहन विभागाच्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी राज्यातील महापालिका स्तरावर स्वतंत्र कार्यालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील काही दिवसांत याबाबतचा शासननिर्णय प्रसिद्ध केला जाईल, असे सरनाईक यांनी सांगितले. दरम्यान, राज्यातीरल सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयात अत्याधुनिक यंत्रणा उभारून संगणकीय प्रणालीवर परवाने देण्यात येतील, अशी माहिती परिवहन आयुक्त विवेक भीमनवर यांनी दिली. महापालिका स्तरावर प्रादेशिक परिवहन कार्यालयाची उभारणी करण्याच्या घोषणेनंतर भाईंदरच्या उत्तन येथे परिवहन कार्यालय सुरू करण्याच्या सूचना सरनाईक यांनी दिल्या. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात असलेली अडीच एकर (९ हजार ७०० चौरसमीटर) इतकी जागा निश्चित करण्यात आली आहे. या जागेचा ताबा त्वरित प्रादेशिक परिवहन विभागाकडे देण्याचे निर्देश परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी अतिरिक्त तहसीलदार नीलेश गौड यांना दिले आहेत.

## मुंबई महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्प; कचऱ्यापासून वीजनिर्मितीची क्षमता वाढणार



■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

देवनारमध्ये कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्याच्या मुंबई महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची क्षमता वाढवण्यात आली आहे. मूळ कंत्राटात कचऱ्यापासून प्रतिदिन ४ मेगावॅट वीजनिर्मिती करण्यात येणार होती. मात्र त्याच कंत्राटांतर्गत आता प्रतिदिन ७ मेगावॅट वीजनिर्मिती करण्यात येईल. हा प्रकल्प पुढीलवर्षी ऑक्टोबर २०२५ मध्ये कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पालिकेच्या देवनार क्षेपणभूमी येथे सध्या तब्बल २० दशलक्ष मेट्रीक टन जुना कचरा जमा झाला आहे. देवनार कचराभूमी शास्त्रोक्त पद्धतीने बंद करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला दिले होते. त्या अंतर्गत पालिकेने तेथे कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्याचे ठरवले होते. गेल्या आठ-दहा वर्षापासून पालिकेचे त्यासाठी प्रयत्न सुरू होते. २०१४ मध्ये एकाचवेळी तीन हजार मेट्रीक टन कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा प्रकल्प उभारण्यासाठी निविदा मागवण्यात आल्या होत्या. मात्र त्याला प्रतिसाद न मिळाल्यामुळे मग छोट्या क्षमतेचे तीन प्रकल्प उभारण्याचे ठरवले. त्यानुसार ६०० मेट्रीक टन कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा प्रकल्प उभारण्याचे निश्चित झाले आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून नोव्हेंबर २०२० मध्ये कार्यादेश देण्यात आले होते. त्यानंतर या प्रकल्पासाठी पर्यावरणीय, किनारपट्टी नियमन क्षेत्र परवानगी, एमपीसीबीची परवानगी घेण्याची कार्यवाही पार पडली. या प्रकल्पाची आखणी व बांधकामाला २०२२ पासून सुरुवात झाली असून हा प्रकल्प पुढील वर्षी ऑक्टोबर २०२५ पासून कार्यान्वित होणार आहे. प्रकल्पातून मिळणाऱ्या विजेचा वापर पालिकेच्या भांडूप संकुलातील विविध विद्युत यंत्रणांसाठी केला जाणार आहे.

## फरारी आरोपींची मालमत्ता जप्त करा: देशमुख हत्याप्रकरणी मुख्यमंत्र्यांचे आदेश

■ मुंबई : विशाल कारंडे

बीड प्रकरणातील फरारी आरोपींची संपत्ती व मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिले. त्याचबरोबर बंदुकी-पिस्तुले दाखवीत छायाचित्रे काढलेल्या बीडमधील नेत्यांचे व धनदांडग्यांचे शस्त्र परवाने रद्द करण्याचे निर्देशही फडणवीस यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले.

फडणवीस यांनी बीड येथील गुन्हेगारी आणि मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासाचा आढावा घेतला. याप्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी तपास करीत आहेत. काही आरोपी गेल्या काही दिवसांपासून फरारी असून त्यांचा छडा तपास पथकांना लागलेला नाही. त्यामुळे या फरारी आरोपींची संपत्ती



जप्त करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश फडणवीस यांनी सीआयडीचे अतिरिक्त पोलीस महासंचालक प्रशांत बुरडे यांना दिले, असे गृह खात्यातील उच्चपदस्थांनी सांगितले. त्याचबरोबर बीडमधील वाढलेल्या गुन्हेगारीला आळा घालण्याबाबतही त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना काही सूचना दिल्या. बीड जिल्ह्यात पोलिसांकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रपरवाने देण्यात आले आहेत. राजकीय नेते, कार्यकर्ता, धनदांडगे व इतरांकडून गुंडगिरी व दहशत दाखविण्यासाठी त्याचा वापर होत असल्याच्या तक्रारी आहेत. काही जणांनी बंदुका-पिस्तुले दाखवीत छायाचित्रे काढली आहेत व ती समाजमाध्यमांवर टाकली आहेत, हवेत गोळीबार करीत असल्याची चित्रीकरणे केली आहेत. त्यातून बीड जिल्ह्यात राजरोसपणे गुंडगिरी व दहशत असल्याचे चित्र असल्याचे दिसून येत आहे.

## मनमोहनसिंग यांचा केंद्र सरकारने केला अपमान: विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा आरोप

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

स्मारक बांधता येईल अशी जागा न निवडता निगमबोध घाटावर माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय भाजपप्रणीत केंद्र सरकारने घेतला. या सरकारने देशाच्या थोर सुपुत्राचा व पहिल्या शीख पंतप्रधानांचा घोर अपमान केला आहे, असा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे माजी पक्षाध्यक्ष राहुल गांधी यांनी शनिवारी केला. त्यावर केंद्र सरकारने म्हटले आहे की, त्यांचे स्मारक उभारण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. स्मारकासाठी जागा निश्चित करून त्यासाठी ट्रस्ट स्थापन केला जाईल. राहुल गांधी म्हणाले की, मनमोहनसिंग १० वर्षे पंतप्रधान होते. त्यांनी आखलेल्या धोरणांमुळे आजही गरीब व मागासवर्गीयांना मोठे बळ मिळते. आजवर सर्व माजी पंतप्रधानांचे अंतिम संस्कार



विशिष्ट स्थळी करण्यात आले. मात्र मनमोहनसिंग यांच्या अंत्यसंस्कारांच्या वेळी भाजपप्रणीत सरकारने वेगळी भूमिका घेतली. काँग्रेसच्या सरचिटणीस व खासदार प्रियांका गांधी म्हणाल्या की, सिंग यांच्या अंत्यसंस्कारासाठी भाजपप्रणीत केंद्र सरकारने योग्य जागा उपलब्ध करून दिली नाही. सरकारने म्हटले आहे की, मनमोहनसिंग यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय शुक्रवारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतल्याचे गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना कळविले होते. या स्मारकासाठी ट्रस्टची स्थापना व जागेची निवड करणे याला काही कालावधी लागू शकतो, असेही सरकारने म्हटले होते. अंत्यसंस्कार आणि स्मारकावरून केंद्र सरकारने विनाकारण वाद वाढवल्याचा आरोप शनिवारी काँग्रेसचे वरिष्ठ नेते अशोक गहलोत यांनी केला.

## प्रदूषण रोखण्यासाठी पुन्हा रस्ते धुण्याचा प्रयोग, शंभर टँकर तैनात

■ मुंबई : सम्यक कासारे

हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी पालिकेच्या घनकचरा विभागाने पुन्हा एकदा रस्ते धुण्यास सुरूवात केली आहे. प्रमुख आणि छोट्या रस्त्यांवरील स्वच्छता व धूळ प्रतिबंधासाठी पाण्याची फवारणी केली जात आहे. त्याचबरोबर रस्ते ब्रशने स्वच्छ करून, पाण्याने धुवून काढण्यासाठी १०० टँकर



तैनात करण्यात आले आहेत.

वातावरणातील बदलामुळे मुंबईतील हवेचा दर्जा बिघडत चालला आहे. गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही मुंबई महापालिकेने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियमावली तयार केली आहे. त्या नियमावलीतील उपाययोजनांच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. त्यात रस्त्यांच्या स्वच्छतेचाही समावेश आहे. त्याअंतर्गत आता धूळ प्रतिबंधासाठी रस्त्यांवर पाणी फवारणे, रस्ते पाण्याने धुणे अशा उपाययोजना केल्या जात आहे. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने मार्गदर्शक तत्वे आणि प्रमाणित कार्यपद्धती यापूर्वीच लागू करण्यात आली आहे. त्यात बांधकामांशी संबंधित बाबींचाही समावेश आहे. वायू प्रदूषणासाठी कारणीभूत ठरणाऱ्या छोट्यामोठ्या घटकांवरही पालिकेच्या यंत्रणेने अधिक लक्ष केंद्रीत केले आहे.

महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी एकत्रित येऊन वायू प्रदूषण आणि वातावरणातील बदलाचे परिणाम ओळखून त्यावर एकसंधपणे कार्यवाही सुरू केली आहे. त्यात, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग, इमारत प्रस्ताव विभाग, रस्ते व वाहतूक विभाग आणि प्रशासकीय विभाग कार्यालय यांचा समावेश आहे. महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रशासकीय विभाग कार्यालयाने आपल्या कार्यक्षेत्रात वायू प्रदूषण कमी करण्यासाठी स्थानिक गरजांनुसार उपाययोजना आखल्या आहेत.

विविध प्रशासकीय विभागांमध्ये ट्रॅकवरील फॉग मिस्ट कॅनॉन यंत्रणेच्या माध्यमातून दोन सत्रांमध्ये शिफ्ट पाण्याची फवारणी केली जात आहे. ज्या ठिकाणी बांधकाम, पाडकाम, खोदकाम सुरू आहे, अशा ठिकाणी प्रकर्षाने पाणी फवारले जाते. वॉर्डमधील दुय्यम अभियंता विविध विभागांशी समन्वय साधून दररोज विविध स्थळांची पाहणी करून वाहनांचे मार्ग निश्चित करतात.

## वेदनाविरहित वैद्यकीय उपचारासाठी सुई विरहित शॉक सिरिंज; आयआयटी मुंबईचे संशोधन

■ मुंबई : नितीन देवळेकर

इंजेक्शनचा उल्लेखही अनेकांच्या अंगावर काटा आणणारा ठरतो. काहींमध्ये ही भीती इतकी प्रबळ असते की रुग्ण उपचार घेण्यास नकार देतात. मधुमेही रुग्णांना इन्सुलिनचे इंजेक्शन वारंवार घ्यावे लागत असल्याने त्यांना हा ताण अधिक असतो. मात्र आता सुई नसलेले इंजेक्शन आयआयटी मुंबईतील संशोधकांनी विकसित केले आहे. आयआयटी मुंबईच्या संशोधकांनी शॉकवेव्ह-आधारित सुई-विरहित सिरिंज विकसित केली. त्या सुईमुळे शरीरात वेदनाविरहित आणि सुरक्षितपणे औषध पसरवता येते. या सिरिंजमुळे त्वचेला होणारी इजा आणि संसर्गाचे प्रमाण कमी होत असल्याचा दावा आयआयटीच्या संशोधकांनी केला आहे.

आयआयटी मुंबईच्या एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातील प्रा. वीरेन मेनेझेस यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांच्या गटाने सुई न टोचता शरीरात औषध सोडण्याचे तंत्र 'शॉक सिरिंज' वापरून विकसित केले आहे. शॉक सिरिंज नेहमीच्या बॉलपॉईंट पेनापेक्षा किंचित लांब असून २०२१ मध्ये प्रा. मेनेझेस यांच्या प्रयोगशाळेत ती विकसित करण्यात आली. जर्नल ऑफ बायोमेडिकल मटेरिअल्स अँड डिव्हायसेसमध्ये त्यांचा अभ्यास प्रकाशित झाला. या अभ्यासात त्यांनी प्रयोगशाळेतील उंदरांवर शॉक सिरिंजने दिलेले औषध आणि नेहमीच्या इंजेक्शनने दिलेले औषध याच्या परिमाणकारकतेची तुलना केली.

नेहमीचे सुईसह असलेले इंजेक्शन जोरात टोचल्यास त्वचेवर किंवा त्वचेखालील उतींवर आघात होऊ शकतो. इंजेक्शनमुळे शरीरातील उतींचे कमीतकमी नुकसान व्हावे यासाठी शॉक सिरिंज महत्त्वपूर्ण ठरते. शॉक सिरिंजमध्ये आवाजाच्या वेगापेक्षा जास्त वेगाने जाणारे उच्च ऊर्जा असलेले आघात तरंग वापरून त्वचेला छिद्र पाडले जाते. सिरिंजच्या तोंडाच्या छिद्राची रुंदी फक्त १२५



मायक्रोमीटर म्हणजे मानवी केसाच्या जाडीएवढी ठेवली आहे. तोंड लहान असल्याने इंजेक्शन आत जाताना त्रास होत नसल्याचे पीएचडीच्या विद्यार्थिनी आणि अभ्यासाच्या प्रमुख लेखिका प्रियांका हंकारे यांनी सांगितले.

संशोधकांनी तीन वेगवेगळ्या चाचण्यांच्या माध्यमातून तीन औषधे उंदरांमध्ये टोचली. हाय-परफॉर्मन्स लिक्विड क्रोमॅटोग्राफी पद्धत वापरून औषधाचे शरीरातील वितरण आणि शोषण मोजण्याकरता संशोधकांनी रक्तातील आणि ऊतींमधील औषधांची पातळी मोजली. तसेच भूलीचे औषध उंदरांच्या त्वचेत टोचले, तेव्हा शॉक सिरिंजने तोच परिणाम साधला जो सुई टोचण्याने झाला. दोन्ही प्रकारात, भुलीचा परिणाम तीन ते पाच मिनिटांनी सुरु झाला आणि २० ते ३० मिनिटे टिकला. यावरून शॉक सिरिंज अनुरूप असल्याचे सिद्ध झाले. बुरशीविरोधी औषधांचे वितरण करताना शॉक सिरिंज ही नेहमीच्या सुई असलेल्या सिरिंजपेक्षा जास्त परिणामकारक ठरली. शॉक सिरिंजने मधुमेही उंदरांना इन्शुलिन दिल्यावर नेहमीच्या सुईच्या तुलनेत रक्तातील साखरेची पातळी प्रभावीपणे खाली गेल्याची आणि जास्त काळासाठी कमी राहिल्याचे संशोधकांना आढळून आले. सुईपेक्षा शॉक सिरिंजने उंदरांच्या त्वचेला झालेले नुकसान कमी होते तसेच शॉक सिरिंजच्या वापरामुळे होणारा दाह कमी असल्याचे दिसून आले.

शॉक सिरिंजमध्ये एक सूक्ष्म आघात नलिका असून त्याचे तीन भाग आहेत. ड्राइवर, ड्राईव्ह करायचा भाग आणि औषधधारक भाग. हे तिन्ही एकत्रितपणे काम करून आघात तरंगाच्या माध्यमातून अतिसूक्ष्म फवारा तयार करतात. हा फवारा शरीरात औषध पसरवतो. या फवाऱ्याचा वेग विमानाच्या उड्डाणावेळी असलेल्या वेगाच्या दुप्पट असतो. हा द्रवरूपी औषधाचा फवारा सिरिंजच्या तोंडातून बाहेर पडून त्वचेला भेदून शरीरात जातो. ही संपूर्ण प्रक्रिया रुग्णाला काही कळायच्या आत अत्यंत वेगाने आणि तरी सौम्यपणे होते.

## काँग्रेसमध्ये संघटनात्मक बदल; खरगेंचे संकेत; बाबासाहेब आंबेडकरांच्या सन्मानासाठी पक्ष कटिबद्ध

■ बेळगाव : प्रथमेश चव्हाण

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत राज्यसभेत जे वक्तव्य केले त्याची चूक मान्य करण्यास सरकार किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी तयार नाहीत, अशी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली. घटनेच्या शिल्पकारांच्या सन्मानासाठी काँग्रेस पक्ष संघर्ष करेल, अशी ग्वाही खरगे यांनी दिली. तसेच पक्ष संघटनेत नव्यांना संधी देऊन, स्थानिक नेतृत्व बळकट केले जाईल असे त्यांनी जाहीर केले.

काँग्रेस कार्यकारिणीच्या येथील बैठकीच्या उद्घाटनावेळी खरगे यांनी भाजपवर चौफेर टीका केली. महात्मा गांधी यांनी बेळगाव येथे काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारण्याच्या घटनेला शंभर वर्षे झाली. त्यानिमित्त पक्षाने येथे 'नव सत्याग्रह बैठकी'चे आयोजन केले आहे. या बैठकीत पुढील वर्षाच्या पक्ष कार्यक्रमाची कृती योजना आखली जाईल. निवडणूक



आयोगासह सर्व घटनात्मक संस्थांवर नियंत्रण असून, जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास उडत असल्याची बाब चिंताजनक असल्याचा दावा खरगेंनी केला. त्याबाबत काही दिवसांपूर्वी त्यांनी निवडणूक नियमांत बदल केल्याचा संदर्भ खरगे यांनी दिला. याखेरीज मतदार याद्यांमधून नावे वगळणे, शेवटच्या टप्प्यात मतटक्का वाढणे किंवा काहींना मतदापासून रोखणे असे काही प्रश्न आहेत. मात्र त्याला समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. राज्यसभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आंबेडकर यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले. आम्ही त्यावर आक्षेप घेतले.

देशभर आता निदर्शने सुरू आहेत. मात्र पंतप्रधान चूक मान्य करण्यास तयार नाहीत. शहा यांनी माफी मागणे दूरच, उलट ते त्यांचे समर्थन करत आहेत, अशा शब्दात खरगेंनी पंतप्रधानांना लक्ष्य केले. महात्मा गांधी हे काँग्रेसचे प्रेरणास्त्रोत आहेत. मात्र दिल्लीत जे सत्तेत आहेत त्यांच्याकडून हे विचार संपवण्याचा प्रयत्न होतोय.

## वांद्रे-वरळी सागरी सेतूच्या पाण्याखालील खांबांची अत्याधुनिक तंत्रज्ञानाने तपासणी

■ मुंबई : गणेश बागडे

वांद्रे-वरळी सागरी सेतूच्या देखभाल-दुरूस्तीच्या कामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) सेतूच्या पाण्याखालील सर्व खांबांची अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तपासणी केली जाणार आहे. खोल समुद्रात वर्षानुवर्षे खांब असल्याने खांबांवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे खांबांची दुरूस्ती करणे किंवा त्यात आवश्यक ते बदल करणे गरजेचे असते. त्या अनुषंगाने एमएसआरडीसीने सेतूच्या खांबांच्या तपासणीसाठी नुकतीच निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यानंतर आवश्यक ती दुरूस्ती किंवा बदल केले जाणार आहेत. मुंबईतील वाहतुक व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत



महत्त्वाचा असा ५.६ किमीचा सागरी सेतू वाहतूक सेवेत दाखल होऊन १५ वर्षे झाली. खोल समुद्रात या सेतूचे खांब असल्याने तीन ते पाच वर्षाच्या काळात सर्व खांबांची तपासणी करून आवश्यक ती दुरूस्ती करुन घेणे सेतूच्या सुरक्षेच्यादृष्टीने अत्यंत गरजेचे असते. त्यानुसार आतापर्यंत सागरी सेतूवरील पथकर वसूलीची जबाबदारी असलेल्या कंत्राटदाराकडूनच खांबांची तपासणी केली जात होती. आता पहिल्यांदाच एमएसआरडीसी कडून खांबांची दुरूस्ती केली जाणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही दुरूस्ती केली जाणार असल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.